दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2021-2023
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● शनिवार दि.३ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक ९३ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

## मुणगे-आडबंदर वासीयांचे पाणीप्रश्नी साखळी उपोषण

**मुणगे । वार्ताहर**

येथील आडबंदर नळपाणी पुरवठा नियमितपणे सुरळीत व्हावा तसेच जलजीवन मिशन योजनेतून मुणगे -आडबंदरसाठी मंजूर झालेले काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे, या मागणीसाठी ग्रामपंचायतनजीक साखळी उपोषण छेडण्यात आले.

मुणगे ग्रामपंचायतीकडून आडबंदर येथे होणारा पाणी पुरवठा गेले सात महिने बंद आहे. जुनी पाईपलाईनही नादुरुस्त आहे. जलजीवन मिशन योजनेतून मुणगे-आडबंदरसाठी मंजूर झालेल्या कामाचा कार्यारंभ ८ फेब्रुवारी २०२३ ला प्रस्तावित होता व काम पूर्ण करण्याचा कालावधी २८ फेब्रुवारी २०२४ होता. पण, अद्याप काम सुरु झालेले नाही.



तीन वर्षापूर्वी मुणगे आडबंदर नळयोजनेवर ९४ लाख रुपये खर्च झाले. पण, पाणी पुरवठा सुरळीत झाला नाही.

गावकऱ्यांनी मागणी करूनही त्याची चौकशी झाली नाही. जलजीवन मिशनचे काम सुरु होऊन कधी पूर्ण होणार? याचे ठोस उत्तर मिळाल्यानंतर हे साखळी उपोषण आंदोलन मागे घेण्यात येईल, असा इशारा मुणगे आडबंदरवासीयांनी दिला. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता उदयकुमार महाजनी यांनी घटनास्थळी भेट देऊन ग्रामस्थांसमवेत संवाद साधला. मुणगे नळ योजना दुरुस्ती करणे हे काम मंजूर असून या कामाची उर्ध्व वाहिनी व साठवण टाकी हे काम ३१ मार्च २०२४ पूर्वी करणार असून ते काम करीत असताना पाणी पुरवठा खंडीत होणार नाही, याची सर्वस्व जबाबदारी या कार्यालयाची राहील याची दक्षता घेण्यात येत आहे. साठवण टाकीच्या पुढील वितरण व्यवस्थेची पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्याची जबाबदारीही ग्रामपंचायत मुणगेची राहील.

**...तर बेमुदत उपोषण छेडणार**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत मुणगे नळ योजना दुरुस्ती करणे या कामाची चौकशी करण्याबाबत सुचवल्याप्रमाणे या कामाची चौकशी करण्यात येईल व चौकशीचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल. उपोषण मागे घ्यावे, असे लेखी पत्र जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता उदयकुमार महाजनी यांनी ग्रामस्थांना दिले. पत्र प्राप्त झाल्याने ग्रामस्थांनी ३१ मार्च २०२४ पर्यंत साखळी उपोषण स्थगित केले आहे; मात्र, मुदतीपूर्वी मागण्या पूर्ण न झाल्यास बेमुदत उपोषण छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांच्यावतीने देण्यात आला.

## सावंतवाडी मोती तलावातील पाण्याबाबत उपाय योजणार

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

मोती तलावातील मासे मृत होण्यामागे पाण्यातील ऑक्सिजन लेवलच कमी झाल्याचे कारण पुन्हा एकदा पुढे आले आहे. पालिकेने चाचणीसाठी पाठवलेल्या पाण्याचे नमुने प्राप्त झाल्याचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांनी सांगितले. पाणी सतत हलते ठेवण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा लवकरच बसवण्यात येईल, असेही ते म्हणाले.

शहरातील मोती तलावातील मासे मृत होण्याचे प्रमाण अलीकडे वाढले होते. या मागचे नेमके कारण काय० हे समजून शकत नसल्याने पाण्याची चाचणी करण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता. तलावाचे पाणी मुळदे संशोधन केंद्रात पाठवले होते. तत्पूर्वी माजी नगराध्यक्ष बबन साळगावकर यांनी ते पाणी टेस्टिंगसाठी कोल्हापूर येथील खाजगी लॅबोरेटरीमध्ये पाठवले होते. त्या ठिकाणी पाण्यामधील ऑक्सिजन लेवल कमी झाल्याचे समोर आले होते. आता पालिकेने पाठवलेल्या पाण्याच्या चाचणीचा रिपोर्टही ऑक्सिजन लेवल कमी झाल्याचाच आला आहे. एकूण या मागची नेमके कारणे काय० यावर आता पालिका प्रशासन काम करणार असून लवकरच तलावाचे पाणी सतत हलते ठेवण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा मोती तलावात बसवण्यात येणार आहे. हे काम लवकरात लवकर करण्यात येणार असून तलावामध्ये तेलयुक्त सांडपाणी येते का० याची खात्रीही प्रशासनाकडून केली जाणार आहे. त्याबाबतचा सर्व्हेही सुरू असल्याचे मुख्याधिकारी

पान ३ वर...

## थोडक्यात



### निगुडे कालव्यानजिक खड्ड्यात सापडले मगरिचे पिल्लू

**बांदा । वार्ताहर**

निगुडे येथील कालव्यानजीक खोदलेल्या खड्ड्यात पडलेल्या दोन फुटी मगरीच्या पिल्लाला ग्राम स्थांनी जीवनदान दिले. इन्सुली शिवसेना विभाग प्रमुख राजन परब यांनी त्या मगरीला पकडून इन्सुली येथील प्राणीमित्र काका चराटकर यांच्या उपस्थितीत नैसर्गिक अधिवासात सोडले. हे मगरीचे लहान पिल्लू असल्याने मोठी मगर असण्याची शक्यता नाकारता येत नाही असा तर्क वर्तविण्यात येत आहे.

### राष्ट्रवादीतून प्रकाश शिगवण यांची हाकालपट्टी

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

सुहास वामन (उर्फ) कुमार शेट्ये माजी जिल्हाध्यक्ष, रत्नागिरी यांना पाठवलेल्या पत्राद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श्री.शरद पवारगट) या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, आमदार, श्री.जयंतराव पाटील यांच्या सूचनेनुसार रत्नागिरी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसपार्टी, कार्याध्यक्ष या पदावरुन श्री. प्रकाश शिगवण यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे. माजी आमदार सूर्यकांत दळवी सोबत गेलेले कार्याध्यक्ष पदी कार्यरत असणारे प्रकाश शिगवण यांची शरद पवार याच्या राष्ट्रवादी पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्याचे राष्ट्रवादीपक्ष पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी लेखी पत्राद्वारे कळविले आहे.



### मोर्लेत शॉर्टसर्किटने आग, काजू बागायातीचे नुकसान

**दोडामार्ग । वार्ताहर**

मोर्ले येथे शॉर्टसर्किटमुळे आग लागून काजू बागायातीचे मोठ नुकसान झालं. सुरेश लक्ष्मण गवस यांची जवळपास २०० कलमे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याची माहिती मोर्लेचे माजी सरपंच गोपाळ गवस यांनी दिली आहे. याबाबतची मिळालेली माहिती अशी की, श्री. गवस यांच्या जमिनीत बीएसएनएलचा टॉवर उभारला आहे. ह्या टॉवरसाठी त्याठिकाणी एक विजेचा मीटर बसविण्यात आला. याच विजेच्या मीटरकडे मोठ्याने स्फोट होत शॉर्टसर्किट होऊन ही आग लागली. दुपारची वेळ असल्याने आग भडकली. यात सुमारे २०० काजू कलमे होरपळली. याच आठवड्यात काजु कलमांना बोंडू यायला सुरुवात झाली होती. काजूची झाडे आगीत होरपळल्याने गवस यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

## ओसरगाव टोलनाका येथे रस्ता सुरक्षा पंधरवड्या निमित्त जनजागृती मोहीम

**कणकवली । प्रतिनिधी**

वाहन चालकांनी वाहन चालवताना नेहमी हेल्मेटचा वापर करावा. तसेच चारचाकी, ट्रक, टेम्पो, ट् ट्रॅव्हल्ससारखी वाहने चालविताना नेहमी सीटबेल्टचा वापर करा. जेणेकरून अपघातासारख्या प्रसंग वेळी कोणतीही गंभीर इजा आपणास होणार नाही.आपल्या कुटुंबातील अल्पवयीन मुलांना वाहने चालवण्यास देऊ नका,असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक रिजवाना जी. नदाफ यांनी केले. सिंधुदुर्ग जिल्हा वाहतूक शाखेच्यावतीने



ओसरगाव टोलनाका येथे ३४ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा पंधरवड्या निमित्त वाहन चालकांना वाहतूक नियमांची माहिती पत्रके वाटून जनजागृती करण्यात आली.

पोलीस निरीक्षक रिजवाना जी. नदाफ म्हणाल्या, आपल्या मुलांना किंवा आपल्या घरातील वाहन चालवणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या वाढदिवसानिमित्त किंवा अन्य कार्यक्रमावेळी हेल्मेट गिफ्ट म्हणून द्या. रक्ताच्या नात्यांना जोपासा, आणि रस्त्याच्या रहदारीने जपून वाहने चालवा. आपला सिंधुदुर्ग जिल्हा' हा पर्यटन जिल्हा आहे. त्यामुळे अनेक पर्यटक सिंधुदुर्ग जिल्ह्यात येत असतात. जिल्ह्यात

पान ३ वर...

## काजूला हमी भाव मिळावा यासाठी सिंधुदुर्ग, रत्नागिरीतील बागायतदार आक्रमक

**बांदा । वार्ताहर**

काजूला राज्य शासनाकडुन हमी भाव न मिळाल्यामुळे कवडीमोलाने काजू विकण्याची पाळी संबंधित बागायतदारांवर आली आहे. त्यामुळे शासनाच्या नियमानुसार किमान २०० रुपयाचा हमीभाव जाहीर करा, अन्यथा १० फेब्रुवारीला सिंधुदुर्ग, कोल्हापुर, रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना एकाच वेळी धरणे आंदोलन करतील, असा इशारा आज येथे आयोजित पत्रकार परिषदेत सावंतवाडी-दोडामार्ग शेतकरी व फळबागायतदार संघाचे अध्यक्ष विलास सावंत यांनी




दिला. याबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांना त्यांनी निवेदन दिले आहे. यावर लवकरात-लवकर तोडगा काढण्यात यावा आणि संबंधित बागायतदारांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. जीआय मानांकन मिळालेल्या काजूला अद्याप पर्यंत हमीभाव मिळालेला नाही. त्यामुळे शेतकर्यांना याचा फटका सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर बागायतदार संघाची भूमिका जाहीर करण्यासाठी श्री. सावंत यांनी आज या ठिकाणी पत्रकार परिषद घेतली. यावेळी प्रगतशील शेतकरी नितीन मावळणकर, करमळकर सर, एस.टी. सावंत, कळणे सरपंच अजित देसाई, जनार्दन नाईक, वैभव मुरुडकर, सातुळी सरपंच दिना कशाळीकर, विश्वनाथ गवस उपस्थित होते. यावेळी श्री.सावंत म्हणाले, दापोली कृषी विद्यापीठाने सन २०२० मध्ये काजूचा उत्पादन खर्च प्रति किलो १२२.५० रुपये असल्याचा अहवाल दिला होता. यात प्रत्येक मजुराची मजुरी २३९ रुपये धरलेली आहे. मात्र प्रत्यक्षात

पान ३ वर...

## शेतकरी महिलेच्या म्हैस विक्रीतून आलेल्या रक्कमेवर चोरट्यांचा डल्ला

**कुडाळ । प्रतिनिधी**

कुडाळ तालुक्यातील किनळोस या गावातील महिलेच्या घर फोडून आतील ४० हजार रुपये रोख रक्कम अज्ञात इसमाने चोरून नेल्याची घटना घडली. या महिलेने म्हैस विक्रीतून आलेली रक्कम पत्र्याच्या ट्रंकमध्ये ठेवली होती. अज्ञाताने ती ट्रंक फोडून रोख रक्कम चोरून नेली. ही घटना शुक्रवारी (दि. २) दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. याबाबत पोलीस स्थानकात उशिरापर्यंत अधिकृत नोंद नव्हती.

यातील महिला शेतकरी असून ती सकाळी गुरे चारण्यासाठी शेतीभागात गेली होती. यानंतर दुपारी १२ च्या सुमारास गुरे घेऊन घरी आली. यावेळी तिला घराचा दरवाजा संशयास्पदरित्या आढळला. त्यामुळे तिने घरात जाऊन पाहिले असता खोलीतील पत्र्याचा पेटीवजा ट्रंक उघडा दिसला. दरम्यान महिलेला ४० हजार रोख रक्कम गायब झाल्याचे लक्षात आले. अज्ञात इसमाने आतील हा ट्रंक फोडून आतील रोकड चोरून नेल्याचा संशय आला. या महिलेने गेल्या दिवसांपुर्वी आपली एक म्हैस विकून त्यातून आलेली रक्कम या ट्रंकात ठेवल्याचे सांगितले. यातील अज्ञाताने ती संधी साधून

पान ३ वर...

## राजकीय दबावापोटी जिमखाना मैदान कोणाला वापरायला देवू नका

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

राजकीय दबावापोटी सावंतवाडीचे जिमखाना मैदान कार्यक्रम तसेच अन्य वापरासाठी देवू नका, तर त्या ठिकाणी खेळणार्या मुलांचे भवितव्य लक्षात घेवू योग्य तो कठोर निर्णय घ्या, अशी मागणी आज ठाकरे शिवसेनेच्या माध्यमातून तालुकाप्रमुख रुपेश राऊळ यांनी सावंतवाडी पालिकेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्याकडे करण्यात आली. दरम्यान या ठिकाणी मैदानाला नुकसान होईल असे काहीही केले जाणार नाही. पीचचा भाग झाकुन



अन्य ठिकाणी राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे स्टॉल लावण्यात येत आहे. राज्यस्तरीय कार्यक्रम आहे त्यामुळे सर्वांनीच सहकार्य करा, असे आवाहन श्री. साळुंखे यांनी यावेळी केले. सावंतवाडी जिम खाना मैदानावर ९ तारखेपासून राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन होत आहे. या पार्श्वभूमीवर त्या ठिकाणी मैदान अन्य कारणासाठी वापरण्यात येवू नये, अशी मागणी आज सर्व पक्षीय तसेच क्रीडा प्रेमींकडुन करण्यात आली. त्यानंतर त्या ठिकाणी शिवसेनेच्या पदाधिकार्यांनी भेट घेतली. यावेळी रुपेश राऊळ यांनी श्री. साळुंखे यांचे लक्ष वेधले. आमचा विज्ञान

पान ३ वर...

## खवले मांजर तस्करीप्रकरणी अटकेतील त्या दोघांच्या घरांचीही झाडाझडती

**दापोली । वार्ताहर**

मुंबई-गोवा महामार्गावरील भरणे येथे काळकाई मंदिरासमोर खवले मांजराला तस्करीप्रकरणी वनविभागाच्या पथकाने गजाआड केलेल्या रायगड जिल्ह्यातील त्या २ संशयितांच्या घरांची गुरूवारी दिवसभर झाडाझडती घेतली. दापोली परिक्षेत्र वनाधिकारी पी.जी. पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाचा दिवसभर महाडमध्येच तळ कायम होता. खवले मांजर तस्करी प्रकरणी मोठे रॅकेट असण्याच्या शक्यतेने वनविभागाकडून कसून तपास करण्यात येत आहे.खवले मांजर तस्करीप्रकरणी आतिश अशोक सोनावणे (तुळशी बुद्रूक बौद्धवाडी) याच्या वनविभागाच्या पथकाने मुसक्या आवळल्यानंतर सखोल तपासाअंती आणखी दोघांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानुसार वनविभागाने तुळशी बुद्रूक खिंडीजवळ रचलेल्या सापळ्यात अनिल धोंडीराम जाधव (रा. नागाव-मडाड, जि.रायगड), राजेंद्र रघुनाथ मोरे (रा.दिवीळ-पोलादपूर, जि.रायगड) या दोघांना रंगेहाथ पकडण्यात आले होते. खवले मांजर तस्करी प्रकरणी अटकेतील तिघांचीही २ दिवस वनविभागाच्या कोठडीत रवानगी केली होती.

## आंबोलीत परप्रांतीयांना जमिनी न विकण्याचा ग्रामस्थांचा ठराव

**आंबोली । वार्ताहर**

परप्रांतीय मोठ्याप्रमाणात कोकणात जमिनी विकत घेत आहेत. एक चांगली गुंतवणूक म्हणून जमिनी खरेदी करण्यात येत आहेत. तर काही बांधकाम व्यावसायिक जमिनी विकत घेऊन तेथे इमारतीची बांधकामे करत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत असून कोकणच्या निसर्गाला हानी पोहचत आहे. प्रसिद्ध पर्यटनस्थळ आंबोली येथेही असेच प्रकार चालू असल्याने येथील ग्रामस्थ जागरूक झाले आहेत. काल दिनांक ३१ जानेवारीला आ बोली ग्राम पंचायत कार्यालय येथे आंबोलीतील गावठण फौजदारवाडी ग्रामस्थांची बैठक झाली. यावेळी बाहेरच्या तसेच परप्रांतीय लोकांना जमिनी विकण्यास मज्जाव करण्याबाबत ठराव घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांना स्वाक्षरींचे निवेदन दिले. जमीन ही गावची असल्याने विकण्याचा कोणाला अधिकार नाही, असा ठराव घेण्यात आला. आंबोलीतील बाकी वाडीतील ग्रामस्थांनाही गावातील जमीन विक्रीला पायबंद घालण्याची मागणी केली आहे.

**गावातील १५ एकर जागा परस्पर विकल्याचा आरोप**

आंबोली असलेला कबुलायतदार गावकर जमिन प्रश्न शासन दरबारी सुटण्याच्या मार्गावर असल्याचे लोकप्रतिनिधी सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर हिरण्यकेशी रस्त्यालगत १५ एकर जागा गावाबाहेरील व्यक्तींना काही स्थानिकांनी परस्पर विकल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. संबंधित जागेत जेसेबीने सपाटीकरण सुरू आहे. याविरोधात गावठण ग्रामस्थांनी एल्गार केला असून ते अतिक्रमविरोधात एकवटले. प्रशासनाला स्वाक्षरींचे निवेदन देऊन जिल्ह्याधिकाऱ्यांनी तत्काळ पंचनामे करावे; अन्यथा आंबोली ग्रामस्थांतर्फे आंदोलन करू, असा इशारा यावेळी देण्यात आला. गावातील १९९९ नंतर विकलेल्या सर्व जागेचा सर्व्हे व्हावा तसेच तलाठी कार्यालयात भ्रष्टाचार करून घातलेल्या नोंदी काढून टाकाव्यात आणि जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ यावर आदेश काढून पंचनामे करावेत आणि गाव वाचवावे, अशी मागणी

पान ३ वर...

## उद्धव ठाकरे जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यावर

**कुडाळ । वार्ताहर**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता कुडाळ शहरातील आरएसएन चौक येथे उध्दव ठाकरे यांचे जंगी स्वागत केले जाणार आहे. जिजामाता चौक येथे नागरिक संवाद साधणार आहेत अशी माहिती पत्रकार परिषदेदरम्यान



जिल्हा प्रमुख संजय पडते यांनी दिली. यावेळी उप जिल्हाप्रमुख अमरसेन सावंत, गटनेते अतुल बंगे, तालुका संघटक बबन बोभाटे, बंड्या कोरगावकर, गोट्या चव्हाण आदी उपस्थित होते.

**खासदार विनायक राऊत हॅट्रिक करणार**

यावेळी बोलताना संजय पडते म्हणाले की, उद्धव ठाकरे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. ही प्रचाराची रणधुमाळी असून रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खासदार विनायक राऊत हे हॅटट्रिक करतील असा दावा जिल्हाप्रमुख संजय पडते यांनी केला.

**बाईक रॅलीचे आयोजन**

सिंधुदुर्ग समाचार

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com**

सिंधुदुर्ग समाचार
।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

# अर्थसंकल्प म्हणजे अपेक्षांचा फुसका बार ?

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आधीच स्पष्ट केले होते की या अंतरिम अर्थसंकल्पात कोणत्याही मोठ्या घोषणा केल्या जाणार नाहीत. त्यानंतरही या अर्थसंकल्पाकडून सर्वसामान्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. आर्थिक वर्ष २०२५ चा अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. प्रत्येकजण आपापल्या दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प डीकोड करण्यात व्यस्त आहे. प्रत्येक विभागातील लोक अर्थसंकल्पात स्वत:साठी काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. तथापि, सरकारकडून अशी कोणतीही लोकप्रिय घोषणा झालेली नाही, ज्यामुळे देशात दहशत निर्माण होईल. सरकारनेही करात कोणतेही बदल केले नाहीत. तसेच पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या हप्त्यांची रक्कम वाढवली नाही. गेल्या आर्थिक वर्षांत भारताचा विकासदर जगात सर्वाधिक राहिला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत भारतानं अनेक मापदंड स्थापित केले. असं असलं, तरी महागाई, बेरोजगारी, रुपयाचं घसरलेलं मूल्य, निर्यातीत झालेली घट, परकीय चलनाच्या साठ्यात झालेली घट, परकीय कर्ज, व्यापार तूट, चिंताजनक मानव विकास निर्देशांक यांसारखी आव्हानं भारतापुढं कायम आहेत.

गेल्या वर्षभरात महागाईच्या आघाडीवरही आपल्यापुढच्या अडचणी कायम होत्या. इस्रायल-हमास युद्ध, रशिया-युक्रेन युद्ध, 'ओपेक'कडून तेल उत्पादनात कपात, जागतिक अन्नधान्य उत्पादनात झालेली घट यामुळं महागाई वाढली आणि सर्वसामान्यांची चिंता वाढली. विशेषतः नोव्हेंबर २०२३ नंतर घाऊक आणि किरकोळ महागाई पुन्हा एकदा वाढू लागली. अन्नधान्य चलनवाढीचा दर ८.७ टक्के झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रोजगार मेळे घेऊन नियुक्तीपत्रं दिली असली, तरी काम मागणारे हात आणि प्रत्यक्ष काम मिळणारे हात यात मोठं अंतर पडलं आहे. टाटा, टीसीएस, एन्फोसिससारख्या कंपन्यांनी नव्या नियुक्त्यांना चाप लावला आहे. जागतिक मंदीमुळं उद्योग आणि व्यवसायांवर विपरीत परिणाम झाला आणि रोजगाराच्या संधी कमी झाल्या. आयटी क्षेत्रातील रोजगाराचं चित्र बदललं आणि मोठ्या संख्येनं कर्मचाऱ्यांना नोकरी सोडावी लागली आणि नवीन नियुक्तींच प्रमाणही कमी झालं.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी काल अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी काही महत्त्वाच्या घोषणा केल्या. मात्र, टॅक्स स्लॅबमध्ये कोणताही बदल केला नसल्यामुळे सामान्य करदात्यांच्या पदरी पुन्हा निराशा पडली आहे. तथापि, यावर्षी पहिल्यांदाच देशाचा आर्थिक पाहणी अहवाल मांडण्यात आला नाही. या अर्थसंकल्पात देशातील बेरोजगारी आणि महागाई कमी करण्यासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. या बजेटमध्ये देशातील दलित आणि आदिवासींसाठी नक्की काय दिले आहे तेही सांगता येज नाहीय. प्राप्तिकर स्लॅबमध्येही कोणते बदल या अर्थसंकल्पात केले गेलेले नाहीत. देशाच्या अर्थव्यवस्थेची खरी परिस्थिती समोर येऊ नये म्हणूनच बहुधा यावर्षी पहिल्यांदाच देशाचा आर्थिक पाहणी अहवाल मांडला गेलेला नाहीय. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर तरी अर्थमंत्री खूश करतील, अशा अपेक्षेत असलेल्या करदात्यांना अंतरिम अर्थसंकल्पात प्राप्तिकराचे दर कायम ठेवून निराश केले आहे. २०२३-२४ च्या मूल्यांकन वर्षात आठ कोटींहून अधिक करदात्यांनी रिटर्न भरले होते. अंतरिम अर्थसंकल्पात काहीच दिलासा न मिळाल्याने ते नाराज झाले. महागाईने हैराण झालेल्या करदात्यांना मोदी सरकार कराच्या ओझ्यातून काही प्रमाणात दिलासा देईल, अशी अपेक्षा होती; मात्र अंतरिम अर्थसंकल्पाने त्यांची निराशा केली आहे.

जुनी कर व्यवस्था स्वीकारणाऱ्यांनाही आशा होती की कर स्लॅबमध्ये बदल होईल. विशेषतः, नवीन नियमानुसार प्राप्तिकर सवलत मर्यादा वाढवून तीन लाख रुपये करणे अपेक्षित होते. सध्या जुन्या कर प्रणालीमध्ये २.५० लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कर सूट आहे; मात्र जुन्या करप्रणालीत पाच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना कोणताही कर भरावा लागत नाही. सरकार २.५० ते ५ लाख रुपयांच्या उत्पन्नावर पाच टक्के सवलत देते. अंतरिम अर्थसंकल्पात करदात्यांची निराशा झाली असली तरी लोकसभा निवडणुकीनंतर नवे सरकार स्थापन झाल्यानंतर केंद्रात नव्या सरकारकडून करदात्यांना मोठ्या अपेक्षा आहेत.

भारतात आज २३ कोटींहून अधिक लोक गरीब आहेत. याचे मुख्य कारण हे गरिबी निर्मूलन, रोजगार वृद्धी, सुनियोजित शहरीकरण, पर्यटन विकास, कौशल्य विकास, लोकशाही सबलीकरण, आहार साक्षरता, दर्जेदार व पुरेशी वीज, मुलींचे शिक्षण, नाशिवंत शेतमालाचा टिकाऊपणा याकडे देशाच्या अर्थसंकल्पात दुर्लक्ष होत आहे. खरं तर, अधिक लोकाभिमुख अर्थसंकल्प करण्यासाठी लोकांचा सहभाग घेणे गरजेचं असतं. आपले सरकार मात्र हे गोपनीय पध्दतीने करते. १४० करोड लोकसंख्या असलेल्या देशात अर्थसंकल्पावरील चर्चा फक्त आयकर किती बसणार यापुरतीच मर्यादित राहते, हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण नाही. दोन वेळेची पोट भरण्याची भ्रांत असलेल्या समाजाला आपण देशाच्या अर्थसंकल्प मधील अपेक्षित काय हे विचारून निर्णय प्रक्रियेत सहज सहभागी करून घेऊ शकतो, हे राज्यकर्त्यांना समजणे अपेक्षित आहे. मोफत आरोग्य, शिक्षण व रोजगार ही सरकारची हमी असते. यामध्ये खासगीकरण नको. म्हणून गरीबांचे जीवनमान सुकर होण्याकरिता यामध्ये लोकाभिमुख योजनांवर अर्थसंकल्पाची तरतूद हवी. पण हक्क न देता भीक देण्याची या सरकारची वृत्ती आहे. सार्वजनिक उद्योग कवडीमोल किंमतीत विकण्याचे उद्योग थांबवून ते बळकट करण्यासाठी तरतूद असायला हवी आहे. महिला व बाल आरोग्य, पोषण आहार यासाठी भरीव तरतूद करण्यात यायला हवीय.

# जगद्गुरु विद्रोही तुकोबाराय आम्हांला समजून दिलेच नाहीत..

संत तुकाराम महाराज यांची जयंती म्हणजे २ फेब्रुवारी १६०८. तुम्ही गाथा वाचन, अभंग शतकाचे वाचन, तुकोबाराय जीवन चरित्रावर आधारित थोडक्यात व्याख्यान करावे,आपल्या घरात आपल्या कुटूंबासमवेत प्रतिमा पूजन करावी. विश्ववंदनीय जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकोबाराय यांची गाथा प्रत्येकांच्या घरोघरी असायला हवी. महाराष्ट्र हि संताची भुमी हे सर्वांच्या परिचयातले आहे. इतकी शतके गेली तरी आजही संताच्या कार्याचा प्रभाव गोर-गरीब जनमानसावर तसाच टिकुन आहे, हे वेगळे सांगायची गरज नाही. शहर असो वा गाव, वाडी असो वा तांडा किंवा कोणताही भाषिक असो तो संतांना पुचतो भजतो मानतो समस्त चांगुलपणाचे आणि नैतिकतेचे जनकच संत असे मानणारा वारकरी वर्ग आहे. संत म्हणजे समाजसेवा, संत म्हणजे समानता, संत म्हणजे त्याग आणि समर्पण हे सर्वांना माहिती आहे. पण संत म्हणजे साहित्य हे माञ न चर्चिले गेलेले संताचे अंग.न चर्चिला विषय. भारतातील सर्वच संत उत्तम साहित्यिक होते.

जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज हे निर्भिड सडेतोड रोखठोक व एका अर्थाने विद्रोही संत कवी होते. विशिष्ट वर्गाची पारंपरिक मक्तेदारी असलेला वेदांत तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. 'अभंग म्हटला की तो फक्त जगद्गुरु तुकोबांचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहे वारकरी साहित्यिक अभ्यासक सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतातच तसेच त्यांचे अभंग खेड्यातील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठात आहेत. आजही ही लोकप्रियता 'अभंग' आहे, आणि जगद्गुरु तुकोबाराय यांच्या विचारांची जनजागृती वाढतेच आहे...।

वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा। इतरांनी वहावा भार माथा।।' असे परखड वक्तव्य तुकोबाराय अभिमानाने व्यक्त करतात. 'तुका तरी सहज बोले वाणी। त्याचे घरी वेदांत वाहे पाणी।।' भक्ती -ज्ञान-वैराग्य याने ओथंबलेली जगद्गुरु संतश्रेष्ठ संत तुकारामांची अभंगवाणी परब्रह्माच्या अद्वैताची मनोमन पूजा बांधते. ते विटेवरचे सावळे परब्रह्म सगुण साकार होऊन, स्वत:ला तुकोबांच्या अभंग-भक्तिरसात बुडवून घेण्यात धन्यता मानते. तुम्हाला सांगतो की या विश्वामध्ये एकमेव संत ज्यांचा जन्म तर भुतलावर झाला परंतु त्यांना संपविल्यानंतरही त्यांच्या अस्थि किंवा राख मात्र या भुतलावर कुठे असल्याचा पुरावाच पुसून टाकल्या गेला एवढा धसका त्यांच्या घातपाती मृत्यूनंतर या शोषकांनी त्यांच्या अस्थिच्या राखेचा घेतला होता. कारण त्यांच्या अभंगरुपी घणाघाती वार शोषकांना सोसनं असह्य झाल्यामुळे या अभंगगाथा इंद्रायणी नदीत बुडवून नष्ट करुनही त्या जशाच्या तशा शोषित भारतीयांच्या मुखात राहू शकल्या एवढी ताकद या अभंगरुपी वारात होती,शोषकांवर वार करणारे तुकोबांचे लाखो साहित्य वारकरी आजही तयार होवून या शोषकांवर वार करत आहे. जर का तुकोबांच्या अस्थि या अमुक ठिकाणी आहे एवढे जरी आम्हा साहित्यिकना लेखकांना वारकऱ्यांना माहित असते तर त्या समाधीला नतमस्तक होवून आम्हां साहित्यिकामध्ये वारकऱ्यांमध्ये या शोषकांविरोधात विरश्री संचारली असती व या शोषकांची ही व्यवस्था उधळून लावली असती एवढी ताकद त्यांच्या या अस्थित होती याची जाणीव या शोषकांना नक्की होती त्यामुळे त्यांच्या समाधी पर्यंत कोणी पोहचूच नये याची व्यवस्था त्यांनी पुष्पक विमान वैकुंठ हे भ्रामक शस्त्र आम्हा मराठा बहूजन समाजावर वारकऱ्यांवर चालवून आम्हांला पराभूत केले. याची प्रचीती देहूला गेले असता प्रत्येक मराठा बहूजन समाजाला वारकऱ्याला झाल्याशिवाय राहत नाही. प्रत्येक महाराष्ट्रातील भावीक महापुरुषांच्या समाधीस्थळाला नतमस्तक व्हायसाठी अधीर झालेला असतो. कितीतरी त्रास सहन करत तिथपर्यंत जावून त्या समाधीवर डोक टेकवून धन्य होत असतो परंतु आम्ही मराठा बहूजन समाज व वारकरी देहु ला गेलो असता तुकोबांच्या समाधीवर नतमस्तक होण्यासाठी मन व्याकुळ होवून भिरभिर फिरते पण माझ्या जगद्गुरु तुकोबाच्या अस्थि समाधीरुपानं कुठेच दिसत नाही या अतीव दु:खानं खिन्न मनाने तुकाबांचे वास्तव्य असलेल्या घराचं व त्यांचा घातपात ज्या इंद्रायणीने बधितला तिच्या घाटाचं दर्शन घेवून परतावे लागते.. देहुवरुन माघारी फिरतांना मनोमन एकच विचार येतो की माझ्या जगद्गुरु तुकोबाच्या अस्ती या मातीत आहे एवढं जरी आम्हा साहित्यिकना लेखकांना वारकऱ्यांना माहित असतं तर इथून परतणारा प्रत्येक भावीक स्फुरण घेवून हा शोषकांचा डोलारा उध्वस्त करणारा सच्च्या साहित्य व वारकऱ्याच्या रुपान तुकोबाचा सैनिक होवून शोषकांना परास्त करुन त्यांचा डोलारा उध्वस्त केला असता यात यत्किंचितही शंका नाही. परंतु आम्हा साहित्यिकना वारकऱ्यांना पुष्पक विमानाने तुकोबांचे वैकुंठ गमन झाल्याच्या भ्रामक कल्पनात गुंतवून साहित्याच्या वारकऱ्यांचा वार बोथड केल्या गेला. हे शातीर शोषक त्यांच्या कारस्थानात यशस्वी झाले याची आम्हा जाणीव होवू दिली नाही..।

मी वेदांचा अंकित नाही,भेदभाव सांगणारा वेदांचा भाग गाळून उरलेला भाग मी प्रमाण मानतो, सर्वांच्या ठिकाणी समत्व पाहणे हे ब्रम्हाचे स्वरूप न जाणणारा संत दुराचारी होय, अशी भूमिका त्यांनी घेतली.. सर्वांचे चर्म व मांस समान असताना भेदभाव कशाच्या आधारे करायचा, वाण्याच्या दुकानातून गूळ घ्यायचा असेल तर त्याची जात कूळ कशाला विचारायचे गावाचा मोकाशी हलक्या जातीतील असला तर त्या कारणाने त्याची आज्ञा मानायची नाही काय, असे प्रश्न त्यांनी विचारले. महार व्यक्तीला स्पर्श झाल्यामुळे ज्याला राग येतो तो काही खरा ब्रम्हज्ञानी ब्राम्हण नव्हे, त्याने देहान्त प्रायश्र्चित घेतले तरी त्याचे पाप फिटत नाही, असे त्यांनी म्हटले. त्यांनी सोवळ्या ओवळ्याच्या आणि परंपरागत कल्पना नाकारल्या आणि जो परद्रव्य व परनारी यांच्या बाबतीत सोवळा असतो तोच खरा सोवळा, अशी नैतिक कसोटी सांगितली.. जो जानवे व शेंडी यांच्याबरोबरचा संबंध तोडेल, त्याला कसलीही बाधा होणार नाही,असे म्हटले. विधिनि षेध यज्ञ श्राध्द पूजा भविष्यकथन शुभाशुभ नवस कौल योग समाधी उपवास तीर्थयात्रा वनवास गुहेतील ज्ञान, संन्यास, मोक्ष, यांचे परंपरागत स्वरूप नाकारून त्यांच्यापेक्षा शुद्ध भावना व शुद्ध आचरण यांना खरे महत्व असायचे सांगितले.. त्यांचा ईश्वरही पारलौकिक मूल्यांवर नव्हे, तर माणूसकीवर आधारलेला होता.रंजल्या गांजल्या लोकांना जो आपले म्हणतो, तो खरा साधू आणि देव अशा साधू जवळच राहतो, असे त्यांनी म्हटले. देवपूजा करताना असे संत घरी आले असता देवांना सारून या संतांची पूजा करावी, असे त्यांनी लोकांना सांगितले...।

आजचा वारकरी सांप्रदाय. किर्तनकार प्रवचनकार गायनाचार्य मृदंगाचार्य हे जगद्गुरु तुकोबारायांच्या विचारांचे नसून मनुवादी अंधश्रध्दा कर्मकांडी, सनातनी विचाराचे आहेत.. तुकोबारायांनी यज्ञादी कर्मकांड नाकारुन नाममार्ग सांगितला आज हेच प्रणप्रतिष्ठा ई नावाखाली नामसप्ताहामध्ये यज्ञादी कर्मकांडाचे आयोजन करतात. तुकोबारायांनी देवाच्या व कर्मकांडाच्या नावाखाली त्यामध्ये सर्व आले पिंडदानापासून ते सर्व या सर्वांचा पैसे घेऊन ढोंगी लुबाडनारांना विरोध केला. काही वर्षापूर्वी भारतात विज्ञानाचा लवलेश नसतानाही तुकोबाराय विज्ञानवादी मानवतावादी विश्वकल्यानाचे विचार मांडतात तर आता ढोंगी हे ९०% किर्तनकार समाजाला चमत्काराच्या कर्मकांडाच्या अंधश्रध्देच्या दुनियेत घेऊन जाणारे विचार मांडतात..।

जगद्गुरु तुकोबाराय यांनी अंधश्रध्देवर कडाडून टिका केली लोकांना डोळस होण्यासाठी प्रयत्न केले. स्वतः गरीबीत राहुन लोकांची सेवा केली,अंधश्रध्दा हटवण्यासाठी पहिले स्वतःचे घर व धर्मापासुन सुरुवात करायला पाहिजे मगच दुसऱ्यांकडे वळावे ही शिकवण दिली. सर्वसामान्यांना सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक दहशतीतून मुक्त करण्यासाठी अभंगातून प्रबोधन केले. केलेले हे प्रबोधन तत्कालीन धर्मपंडितांना रुजलेले नाही. त्या मुळे त्यांनी तुकोबारायांचा मानसिक, शारीरिक छळ केला. त्यांच्यावर गावाबाहेर जाण्याची वेळ आली.

त्यांचा इतका छळ केला की त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरले. खरे स्त्रीपुरुष समानता ही वारकरी संप्रदायाचीच देण आहे.. आणि धर्माच्या नावावर अनितीचा बाजार मांडणाऱ्या लोकांना कडवे आव्हान देले. ते एक महान लढवय्ये संत होते. एका विशिष्ट समाजव्यवस्थेच्या मुळाशी निर्भयपणे सुरुंग लावण्याचे काम आणि विशेष सनातनी व्यवस्थेविरुद्ध प्रचंड विद्रोह तुकोबांनी आयुष्यभर केला. थोडक्यात म्हणजे समाजव्यवस्थेला न्यायाचे अधिष्ठान देऊन तिचे निर्मलीकरण करण्यासाठी त्यांनी रात्रंदिवस युध्द केले आणि तत्वासाठी, काही मूल्यांसाठी स्वत:च्या हातांनी एका समाजाच्या वैराचा ज्वालामुखी स्वत:च्या परीवारावर ओढवून घेतला.. अशा महान विश्ववंदनीय जगद्गुरु विद्रोही संतश्रेष्ठ कवींना त्यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन.

**(सौजन्याने)**
**संतोष शकूंतला आत्माराम बादाडे**
**जिल्हाध्यक्ष पुणे- ९६८९४४६००३**
**जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य.**


# सामाजिक बांधिलकी जपणारे प्रयोगशील उद्योजक : रवींद्र प्रभुदेसाई

तांब्या पितळेची भांडी लखलखीत करणारी शायनिंग पावडर तयार करून आणि 'बायको गेली माहेरी, काम करी पितांबरी' ही टॅगलाईन घेऊन उद्योगविश्वात पदार्पण केलेल्या पितांबरी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने आज तीस वर्षांत आपला व्यापार संपूर्ण देशभरात पसरवला आहे. जगभरातील २० हुन अधिक देशांत पितांबरीची उत्पादने निर्यात केली जातात. वेगवेगळ्या नऊ डिव्हिजन्समध्ये काम करताना कंपनीने आज ८२ हुन अधीक दर्जेदार उत्पादने बाजारात आणली आहेत. पितापुत्राने लावलेल्या एका लहानशा रोपट्याचे आज डेरेदार वृक्षामध्ये रूपांतर होतानाच्या प्रवासात दडली आहे ती पितांबरीच्या व्यवस्थापकीय संचालक श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांची प्रयोगशीलता, जिद्द, उत्तम नियोजन, ग्राहक हिताला प्राधान्य देण्याची वृत्ती, दांडगा लोकसंपर्क आणि प्रचंड मेहेनत, एका छोट्याशा खोलीतून पाच हजारांच्या गुंतवणुकीतून सुरु झालेला पितांबरीचा व्यवसाय आज कोटीच्या कोटी उड्डाणे घेत देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचला आहे,

मराठी उद्योग जगतात श्री.रवींद्र प्रभुदेसाई हे नाव जसे आदराने आणि सन्मानाने घेतले जाते, तसे त्यांच्यातील दानशूर वृत्तीमुळे सामाजिक आणि आध्यत्मिक क्षेत्रातही प्रभुदेसाई यांनी एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. ४ फेब्रुवारी हा श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांचा जन्मदिन. यंदा ते वयाची ६१ वर्षे पूर्ण करत आहेत. प्रभुदेसाई यांच्या एकसष्ठीनिमित्त त्यांच्या काही गुणवैशिष्ट्यांची आणि त्यांनी कंपनीला घालून दिलेल्या आदर्शांची थोडक्यात ओळख करून घेऊया.

कोणताही व्यवसाय म्हटला की त्यामध्ये ताण-तणाव, उतार चढाव, लाभ-नुकसान या सर्व बाबी आपसूकच येतात. ३० वर्षांच्या कार्यकाळात प्रभुदेसाईसुद्धा यातुन गेले आहेत, मात्र त्याचा परिणाम त्यांनी त्यांच्या कर्मचारीवर्गावर कधी होऊ दिला नाही. अशाही स्थितीत त्यांची स्थिरता कधी ढळली नाही. याचे श्रेय ते त्यांचे आध्यात्मिक मार्गदर्शक गुरु सनातन संस्थेचे संस्थापक डॉ. जयंत आठवले यांना देतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक साधना करत असल्यामुळे कठीण काळातही आनंदी राहण्याचे त्यांना बळ मिळत असल्याचे ते सांगतात. ते करत असलेल्या व्यष्टी आणि समष्टी साधनेमुळे त्यांचा चेहरा सदैव हसतमुख असतो. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याचे स्वागत ते हसतमुखाने करतात. कंपनीच्या प्रत्येक युनिटची सुरुवात सकाळी सामूहिक प्रार्थनेने होते. जगनियंत्याच्या चरणी शरणागत होऊन प्रार्थना केल्याने मिळणारी ऊर्जा घेऊनच प्रत्येक कर्मचारी दैनंदिन कामाची सुरुवात करतो.

समाजसेवेचा आणि देशभक्तीचा वारसा प्रभुदेसाई यांच्याकडे त्यांच्या वडिलांकडूनच आला आहे. लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत त्यांचे जाणे असल्याने समाजसेवेचे आणि देशसेवेचे बालकडू त्यांना लहानपणीच मिळाले आहे. आपल्या प्रत्येकावर देव, पितर, ऋषी आणि समाज अशी चार ऋणे असतात. त्यापैकी समाज ऋण फेडण्याच्या दृष्टीने ते विविध सामाजिक संस्था, राष्ट्र आणि धर्म यांच्या पुनरुत्थानासाठी झटणाऱ्या संघटना, उदयोन्मुख कलाकार, गरजू व्यक्ती, गतिमंद मुले यांना नियमितपणे दान देत असतात. मग ते दान पैशाच्या स्वरूपात असो वा पितांबरीच्या गृहोपयोगी उत्पादनांच्या स्वरूपात. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि लोकोपयोगी कार्यांना प्रायोजकत्व देऊनही ते सामाजिक बांधिलकी जपत असतात. त्यांच्या प्रत्येक वाढदिवसाला ते ठराविक रकमेचा धनादेश विविध सामाजिक, शैक्षणिक,




आध्यत्मिक संस्थांना, गोशाळांना आणि आश्रमांना अर्पणस्वरूपात देतात. कोरोनाकाळात स्वच्छता दूत, पोलीस कर्मचारी, रुग्णालये यांना पितांबरीचे सॅनिटायजर, मास्क, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारी पितांबरीच्या हेल्थ केअर डिव्हिजनची आयुर्वेदिक औषधे कंपनीच्या वतीने विनामूल्य वितरित करण्यात आली. आषाढी आणि कार्तिकी वारीनिमित्त लाखो वारकरी पंढरीची वारी पायी करत असतात. त्यांच्या सेवेसाठी पितांबरीचा चमू वारीमार्गात दरवर्षी कार्यरत असतो. या चमूतील पितांबरीचे कर्मचारी पितांबरीचे क्युअर ऑन हे वेदनाशामक आयुर्वेदिक तेल वारीतील वारकऱ्यांच्या पायांना लावून त्यांच्या पायांची मालिश करून देतात.

ज्यामुळे वारकऱ्यांना वारीसाठी पुनश्च्य नव्याने मार्गरत होण्यासाठी स्फूर्ती मिळते. मागील अनेक वर्षे हा सेवाभावी उपक्रम कोणताही गाजावाजा न करता अविरतपणे सुरु आहे. पितांबरीत काम करणारा मग तो शिपाई असो वा स्वच्छता कर्मचारी त्याला कर्मचारी म्हणणे प्रभुदेसाई यांना आवडत नाही. पितांबरीचा प्रत्येक कर्मचारी पितांबरी उद्योगसमूहाला पुढे घेऊन जाण्यासाठी आपापलया परीने हातभार लावत असतो, या विचाराने ते कंपनीतील कर्मचाऱ्यांना 'सहकारी' म्हणून संबोधतात आणि इतरांनाही तसेच संबोधण्यास सांगतात. पितांबरीतील सहकाऱ्यांच्या अडी-अडचणीत ते त्यांना आर्थिक साहाय्यही करतात, प्रत्येकाची आपुलकीने चौकशी करतात त्यामुळे पितांबरीचा प्रत्येक सहकारी त्यांच्याकडे मालकाच्या भावनेने नव्हे, तर अन्नदाता पित्याच्या भावनेने पाहतो. आज कंपनीने १२०० हुन अधिक गरजवंतांना कंपनीत रोजगार दिला आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक वर्षे एकाच ठिकाणी नोकरी करणारे कर्मचारी केवळ शासकीय सेवेतच दिसून येतात; मात्र अशाही काळात २० हुन अधिक वर्षे कार्यरत असलेली मोठी फळी केवळ पितांबरी या खासगी कंपनीतच पाहायला मिळते. कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी कंपनीत विविध प्रकारच्या प्रशिक्षण कार्यशाळा, व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व विकास आदींचे अभ्यासवर्ग नियमितपणे घेतले जातात ज्याचा परिणाम म्हणून शिपाई पदावर नोकरीला लागलेले काही जण आज कंपनीत अधिकारीपदावर काम करत आहेत. कोरोनाकाळातही प्रभुदेसाई यांनी कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनाची तारीख कधी चुकवली नाही. मालक आणि कर्मचारी यांचे आपुलकीचे आणि प्रेमाचे एक वेगळे नाते पितांबरीत पाहायला मिळते.

पितांबरी म्हणजे गुणवत्ता हे समीकरण ठरलेले आहे. प्रभुदेसाई यांनी कंपनीच्या प्रत्येक उत्पादनात गुणवत्ता जपताना त्यापासून ग्राहकांना कोणताच त्रास होणार नाही याची विशेष काळजी घेतलेली आहे. ही काळजी घेण्यासाठी आणि उत्पादनाची गुणवत्ता पडताळण्यासाठी प्रभुदेसाई यांनी कंपनीचे स्वतंत्र 'आर अँड डी' युनिट उभारले असून त्याठिकाणी उत्पादनांची गुणवत्ता पडताळण्यासाठी तज्ज्ञांची नेमणूक केली आहे. प्रभुदेसाई यांची आधीपासूनच आयुर्वेदात अधिक रुची असल्याने त्यांनी आपल्या बहुतांश उत्पादनांच्या निर्मितीमध्ये आयुर्वेदाचा आधार घेतला आहे. केवळ व्यवसाय वाढवायचा म्हणून रसायनांचा अधिक वापर करून बाजारात आपले उत्पादन खपवणे हे त्यांना कधीच मान्य झाले नाही. कंपनीच्या हेल्थकेअर डिव्हिजन अंतर्गत बऱ्याच आजारांवर उपयुक्त आयुर्वेदिक औषधांची कंपनीने निर्मिती केली असून अनेक आजारांवर उपयुक्त अशा गोमूत्रापासून पावडर तयार करून त्यापासून वासरहित गोमूत्र प्लस कॅप्सूल बनवणारी पितांबरी ही पहिली कंपनी आहे. कंपनीच्या रसायन विरहित गुळ पावडरला आज देशभरातून मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मराठी माणसांनी नोकरीमध्ये अडकून न पडता लहान मोठा व्यवसाय करावा आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी प्रभुदेसाई वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात.

'लघुउद्योग भारती'चे ते महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असून मराठी व्यावसायिकांच्या कल्याणासाठी ते नेहमीच झटत असतात. सॅटर्डे क्लब सारख्या उद्योजक संघटनेमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. उद्योगश्री पुरस्कार, मदर इंडिया पुरस्कार, राष्ट्रीय उद्योग प्रतिभा पुरस्कार, दाजीकाकाका गाडगीळ उद्योगरत्न पुरस्कार, ज्वेल ऑफ टिसा, इंडस्ट्री मन ऑफ द इयर यांसारखे अनेक मानाचे पुरस्कार रवींद्र प्रभुदेसाई यांना मिळाले आहेत. आज प्रभुदेसाई यांचा पुत्र आणि कन्या दोघेही व्यवसायात वडिलांना हातभार लावत आहेत. रवींद्र प्रभुदेसाईंवर घडलेले संस्कार आज त्यांच्या मुलांमध्ये तितक्याच प्रमाणात उतरलेले दिसून येतात. पितांबरी ही आपल्या मालकीची नसून कंपनीचे समस्त सहकारी हेच तिचे खरे मालक आहेत ही भावना त्यांच्या दोन्ही मुलांमध्ये रुजलेली आहे. नव्याने उद्योग क्षेत्रात उतरणाऱ्या आणि उद्योगक्षेत्रात स्थिरस्थावर झालेल्या मराठी उद्योगपतींसाठी रवींद्र प्रभुदेसाई यांचे उदाहरण निश्चितच दिशादर्शक आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## भाविकांचा आनंद द्विगुणित !

५०० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अयोध्येत भव्य असे श्रीराम मंदिर उभे राहिले. श्रीराम मंदिर उद्घाटन सोहळ्याचा आनंद समस्त देशवासीयांनी दिवाळी साजरी करून व्यक्त केला. त्या आनंदातून बाहेर पडायच्या आधीच आणखी एक आनंदाची बातमी कानी पडल्याने सश्रद्ध हिंदूंमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मागील ३० वर्षांपासून बंद असलेली ज्ञानवापीच्या 'व्यास' तळघरातील पूजा वाराणसी न्यायालयाने आदेश देऊन पुन्हा सुरु करण्यास सांगितले आहे. या आदेशा मुळे आता प्रत्येक भाविकाला तळघरात जाऊन दर्शन घेता येणार आहे. त्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करून देण्याचे आदेशही न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. काशी विश्वनाथ मंदिराच्या आवारात असलेल्या नंदी महाराजांच्या समोर ज्ञानवापीच्या जाण्यासाठी मार्ग तयार करण्यात येणार आहे. ज्ञानवापीच्या तळघरात पूर्वापार चालत आलेली पूजा ३० वर्षांपूर्वी तत्कालीन सरकारने एका समाजाला खुश करण्यासाठी केवळ तोंडी आदेश देऊन बंद केली होती. ही बंदी उठवण्यासाठी भक्तांना न्यायालयीन लढा द्यावा लागला हेच खरे तर दुर्दैव आहे. ज्ञानवापीच्या ठिकाणी मंदिर पाडून मशीद बांधण्यात आल्याचे सबळ पुरावे नुकतेच समोर आल्यामुळे काही दिवसांतच न्यायालय योग्य तो निर्णय हे निश्चित असताना प्राथमिक स्वरूपात तळघरात पूजेची अनुमती मिळाल्याने भाविकांना झालेला आनंद अवर्णनीय आहे.

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग) : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : ॲड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, येथे छापून प्रकाशन स्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६६०२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६६०२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अपार्टमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

पान १ वरून

### सावंतवाडी मोती तलावातील पाण्याबाबत उपाय योजणार

साळुंखे यांनी सांगितले. सुरुवातीच्या काही दिवसात माशांचे मृत होण्याचे प्रमाण लक्षात घेता सद्यस्थितीत तलावातील मासे मृत होण्याचा प्रकार थांबला आहे. दुसरीकडे तलावामध्ये सकाळी सायंकाळी बोटिंगद्वारे पाणी हलते ठेवण्याचे कामही सुरू आहे, असेही मुख्याधिकारी साळुंखे म्हणाले.

### ओसरगाव टोलनाका येथे रस्ता सुरक्षा पंधरवड्या निमित्त जनजागृती मोहीम

येणाऱ्या पर्यटकांनी देखील वाहतुकीच्या नियमांबरोबरच स्वच्छता राखणे देखील महत्त्वाचे आहे. कारण सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन' जिल्ह्याबरोबरच स्वच्छ जिल्हा' म्हणून ओळखला जातो. वाहतूक पोलिसांनी चक्क वाहन चालकांना थांबवून पुष्पगुच्छ देत वाहतूक नियमांचे वाचन करून वाहतूक नियम समजावून सांगितले. यावेळी वाहन चालकांनी समाधान देखील व्यक्त केले.

जिल्हा वाहतूक शाखा सिंधुदुर्ग यांच्या माध्यमातून तसेच अप्पर पोलीस अधिक्षक ऋषिकेश रावले, पोलीस अधिक्षक सौरभ कुमार अग्रवाल, पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा सिंधुदुर्गच्या रिजवाना जी. नदाफ यांच्या मार्गदर्शनाखाली सडक सुरक्षा, जीवन रक्षा अभियान' राबविण्यात आले.

यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक रिजवाना जी. नदाफ, जिल्हा वाहतूक शाखा हवालदार प्रकाश गवस, पोलीस कॉन्स्टेबल आशिष जाधव, राहुल वेंगुर्लेकर, सावकार वावरे, सुनील निकम, रामदास जाधव, वर्षा मोहिते, दैनिक प्रहारचे निवासी संपादक संतोष वायंगणकर, दैनिक पुढारीचे गणेश जेठे, चेतन साटम यांच्यासह वाहन चालक या अभियानात सहभागी झाले होते.

यावेळी पत्रकार संतोष वायंगणकर यांनी पोलिसांनी राबविलेल्या उपक्रमाचे स्वागत केले. तसेच उपस्थित वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमांबाबत मार्गदर्शन केले.

### काजूला हमी भाव मिळावा यासाठी सिंधुदुर्ग, रत्नागिरीतील बागायतदार आक्रमक

५०० रुपये पुरुष व ३०० रुपये महिला अशी मजुरीची स्थिती आहे. सिंधुदुर्गातील काजू बीला जीआय मानांकन प्राप्त असून किमान २०० रुपये हमीभाव शासनाकडून मिळणे आवश्यक आहे. गोवा शासनाने मार्च २०२३ मधील बजेटमध्ये काजू बिला १५० रुपये हमीभाव जाहीर करून प्रत्यक्षात कार्यवाही सुरू केली आहे. जिल्ह्यातील कारखानदार ४० टक्के सिंधुदुर्गातील काजूगर व ६० टक्के परकीय काजूगर मिक्स करून पॅकेट बनवतात व सिंधुदुर्गातील काजूगर म्हणून विकतात. ही ग्राहकांची फसवणूक असून कारखानदारांना इम्पोर्टेड व सिंधुदुर्ग जीआय काजूगर याचा उल्लेख पॅकिंगवर करण्यास बंधनकारक करावे अशी मागणी केली. काजू बी चा दर कमी असूनही काजूगराच्या दराचा आलेख मात्र चढता आहे. जीआय मानांकित भागात निकृष्ट चवीची परकीय काजू बी आयात करणे हे जीआय निकषाच्या विरोधात आहे. परकीय काजू बी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काजू बी मधील घटकद्रव्य व चव वेगळी आहे. परकीय काजूगरात शेंगदाण्यातील घटकद्रव्यांशी साधर्म्य आहे. आपल्या काजूगरामध्ये हाय प्रोटीन्स व विटामिन्स असून चवही उत्कृष्ट आहे. शासनाने काजू बीला किमान २०० रुपये हमीभाव द्यावा, अशी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे मागणी केली आहे. अन्यथा सिंधुदुर्ग, कोल्हापूर व रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना १० फेब्रुवारी रोजी एकाच वेळी लाक्षणिक उपोषण करतील, असा इशारा ही त्यांनी यावेळी दिला.

### शेतकरी महिलेच्या म्हैस विक्रीतून आलेल्या रक्कमेवर चोरट्यांचा डल्ला

चोरून नेली. या महिलेचे घर निर्जन भागात असून घरात कोणी नसल्याचे संधी साधून या रक्कम चोरी झाली असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला. हा चोरटा माहीतगारच असावा असा संशय देखील पोलिसांनी व्यक्त केला आहे. याबाबत पोलीसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरा पर्यंत सुरू होती.

### राजकीय दबावापोटी जिमखाना मैदान कोणाला वापरायला देवू नका

प्रदर्शनास विरोध नाही. परंतु त्या ठिकाणी खोदाई होणार असल्यामुळे त्याचा फटका मैदानाला बसणार आहे. त्यामुळे तेथे खेळणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे योग्य तो निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. दरम्यान हा कार्यक्रम शासनाचा असल्यामुळे आपण विरोध करू शकत नाही. परंतु त्या ठिकाणी मैदानाला नुकसान होणार नाही याची दक्षता आम्ही घेवू, असे श्री.साळुंखे म्हणाले.

### आंबोलीत परप्रांतीयांना जमिनी न विकण्याचा ग्रामस्थांचा ठराव

गावठणवाडी ग्रामस्थांनी केली. दरम्यान, सरपंच सावित्री पालेकर, सदस्य काशीराम राऊत, ग्रामसेवक संदीप गोसावी, तंटामुक्ती अध्यक्ष उल्हास गावडे, प्रकाश गुरव, बबन गावडे, बाळकृष्ण गावडे, अंकुश राऊत, कांता गुरव, प्रथमेश गावडे, मोतीराम सावंत, रंजना गावडे, काशीबाई गावडे, सुनील राऊत, दीपक मेस्त्री, शंकर गावडे, अमित गुरव, राकेश अमृस्कर, झिला गावडे आदी उपस्थित होते.

### उद्धव ठाकरे जनसंवाद यात्रेच्या निमित्ताने सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यावर

उद्धव ठाकरे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर ४ फेब्रुवारी रोजी येत आहेत. यादरम्यान कुडाळ तालुक्याच्या वतीने आरएसएन चौक येथे पक्षप्रमुखांचे जंगी स्वागत केले जाणार आहे. तर आरएसएन चौक ते जिजामाता चौक यादरम्यान बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तर याचवेळी आमदार वैभव नाईक यांच्या फंडातून १५ दिव्यांग बांधवांना मोटारसायकलचे वाटप केले जाणार आहे. त्यानंतर जिजामाता चौक समोरील पटांगणावर उद्धव बाळासाहेब ठाकरे नागरिकांशी संवाद साधतील असे यावेळी उपजिल्हाप्रमुख अमरसेन सावंत यांनी सांगितले.

**शिंदे गटाचे अस्तित्व कुठे?**

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना संजय पडते यांनी शिवसेना शिंदे गटावर टीका करत शिंदे गटाचे अस्तित्व कुठे आहे असा प्रश्न विचारण्यात आला.

**केसरकरांचे प्रोजेक्ट गेले कुठे?**

तर यावेळी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यावर केलेल्या टीकेला उत्तर देताना मंत्री महोदयांनी मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलचे उद्घाटन, चष्म्याच्या फॅक्टरीचे उद्घाटन केले. मात्र, हे प्रोजेक्ट कुठे गेले असा प्रश्न विचारत मंत्री दीपक केसरकर यांच्यावर टीका केली.

निवडणूक तोंडावर आली असताना अद्याप भाजपचा उमेदवार ठरत नाही. यावेळी भाजपवर टीका करताना खासदारकीची निवडणूक तोंडावर आली असताना अद्याप भाजपचा उमेदवार ठरत नाही. त्यामुळे खासदार विनायक राऊत हॅट्रिक करतील असा दावाही यावेळी बोलताना संजय पडते यांनी केला.

# लोकसभा मतदारसंघातील बूथ सक्षम करा : कोकण विभागीय काँग्रेस पदाधिकारी यांची भिवंडी येथे बैठक

**मालवण । वार्ताहर**

कोकण विभागीय काँग्रेस पदाधिकारी यांची भिवंडी येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीत कोकणातील लोकसभा मतदार संघातील इच्छुक उमेदवार म्हणून जिल्हाध्यक्ष यांमार्फत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसकडे पाठवण्यात आलेल्या जिल्ह्यातील इच्छुक उमेदवार यांची सध्याची तयारी, मतदारसंघात केलेल्या पक्ष कार्याची व होणाऱ्या निवडणूकी साठीची तयारी याबाबत आढावा घेत चर्चा करण्यात आली. यावेळी रत्नागिरी- सिंधुदुर्ग मतदार संघातील इच्छुक उमेदवार म्हणून सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस अरविंद मोंडकर यांनी देखील आपण केलेल्या संघटनेतील कामाचे सादरीकरण राज्य प्रभारी चैनीथला यांजवळ दिली.

यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा प्रभारी अजिक्य देसाई, जिल्हाध्यक्ष इर्शाद शेख, माजी जिल्हाध्यक्ष साईनाथ चव्हाण, विलास गावडे, साक्षी वंजारी, रत्नागिरी जिल्हा प्रभारी मनेष राऊत, माजी जिल्हाध्यक्ष रमेश किर, जिल्हाध्यक्ष अविनाश लाड, ॲड. गांगण, सुरेश काटकर, सुगंधा साटम, मेघनाद धुरी, उल्हास मनचेकर, समीर वंजारी,



विधाता सावंत, महेंद्र सांगेलकर, प्रदीप मांजरेकर, उमेश कुलकर्णी, भाबल व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

पदाधिकारी भेट व इच्छुक उमेदवार यांची निवडणूक लढवण्यासाठीअसलेली तयारी याबाबत आढावा घेण्यात आला.

यावेळी निवडणूक जिंकण्यासाठी शंभर टक्के बूथ सक्षम करा. मतदारसंघ पिंजून काढा कोकणातील जनता आजही आपल्या पाठीशी आहे. यापूर्वी देखील युवक काँग्रेस मध्ये असताना मी कोकणात रायगड येथे येऊन गेलो होतो. येत्या काही दिवसात देखील मी कोकणात येणार आहे व तुमच्या सोबत गावोगावी फिरणार असे राज्य प्रभारी चैनीथला यांनी सांगितले. देशात आपल्या काँग्रेस पक्षाला संधी आहे आपल्या सोबत आघाडीत काही पक्ष आहेत राज्यात देखील आपल्याला संधी आहे. तुम नौजवान पार्टी की ताकद हो. आनेवाला समय तुम्हारा है.. तुम्ही प्रत्येकाने ध्येयाने कामाला लागा आम्ही तुमच्या सोबत आहोत असे राज्य प्रभारी चैनीथला यांनी सांगितले. अशीताहिती अरविंद मोंडकर सरचिटणीस सिंधुदुर्ग जिल्हा काँग्रेस कमिटी यांनी दिली.


## थोडक्यात



### सिंधुदुर्गच्या झेडपी सीईओंची जिल्हाधिकारी पदावर बढती

**ओरोस । वार्ताहर**

राज्यातील चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रजित नायर यांची गोंदियाचे जिल्हाधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. तर यवतमाळ झेडपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेनक घोष यांची धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर बदली करण्यात आली आहे. नाशिकच्या कळवण आणि सहायक जिल्हाधिकारी, कळवण उपविभागात खडळझचे प्रकल्प अधिकारी असलेले विशाल नरवडे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तर गोंदियाचे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांची सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर येथे नियुक्ती करण्यात आली आहे.



### सहवेदना

वेंगुर्ला आडारी येथील श्रीमती सरस्वती चंद्रकांत आरोंदेकर वय वर्षे ७८ हिचे नुकतेच अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. कुडाळ येथे खाजगी रुग्णालयात उपचार करून नुकतेच घरी आणण्यात आले होते. वेंगुर्ले येथील पान व्यापारी बाळा आरोंदेकर यांची ती आई होत. तिच्या पश्चात मुलगा,सुन, विवाहित मुली,जावई, नातवंडे असा परिवार आहे.



### कलाकार मानधन समिती सदस्यपदी मारुती सावंत

**कणकवली । वार्ताहर**

गुरुकृपा दशावतार नाट्य मंडळ हळवल कंपनीचे मालक श्री मारुती अनंत सावंत यांची निवड कलाकार मानधन समिती सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.या समितीवर निवड झाल्याने मारुती सावंत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. हळवल गावातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते असलेले मारुती सावंत हे सामाजिक वनीकरण विभागातून सेवानिवृत्त झाले आहे. दशावतार लोककलेची आवड असल्याने त्यांनी गुरुकृपा दशावतार नाट्य मंडळाची स्थापना केली असून या मंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रच्या विविध भागात दशावतारी नाट्यप्रयोग ते सादर करतात. त्याचबरोबर अनेक कलाकारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यांची समितीवर निवड झाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

# विठू माऊलीच पहिलेच रिंगण रत्नागिरीत

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत व सुवर्णजयंती नगरोत्थान म हाअभियान जिल्हास्तर अंतर्गत रत्नागिरी नगर परिषदेच्या जिजाम ाता उद्यान येथील सुशोभिकरण करणे या विकास कामाचा लोकार्पण सोहळा मा. ना.श्री. उदय सामंत(उद्योगमंत्री) महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रत्नागिरी व रायगड जिल्हा यांच्या शुभहस्ते दिनांक ०४/०२/२०२४ सायंकाळी ६.०० वाजता पार पडणार आहे. या अंतर्गत म हाराष्ट्रातील सर्वात उंच श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण तसेच श्री. बालशिवाजी व जिजामाता यांच्या पुतळ्याचे अनावरण होणार आहे.

तसेच सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रत्नागिरी नगर परिषदेच्या शिर्के उद्यान सुशोभिकरण करणे या



विकासकामाचा लोकार्पण सोहळा मा.ना. श्री.उदय सामंत(उद्योगमंत्री) महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रत्नागिरी व रायगड जिल्हा यांच्या शुभहस्ते दिनांक ०५/०२/२०२४ सायंकाळी ६.०० वाजता पार पडणार आहे. या अंतर्गत श्री विठ्ठलमाऊलींच्या मुर्तीचे अनावरण करण्यात येणार आहे.

या मध्ये मोठ्या संख्येने वारकरी संप्रदाय, विविध भजनी मंडळे सहभागी होणार आहेत. यावेळी होणाऱ्या वारकरी दिंडी मध्ये जवळ जवळ ३ हजारच्या वर वारकरी सामील होणार असल्याची माहिती रत्नागिरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तुषार बाबर यांनी पत्रकार परिषदेमध्ये माहिती दिली. विठू माऊलीच पहिलेच रिंगण रत्नागिरीत होत आहे. तसेच बैलगाडीचे ही रिंगण होणार आहे. या दोन्ही अभुतपुर्व सोहळ्यांसाठी रत्नागिरीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन नगरपरिषद प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

# श्री देव उपरलकर देवस्थानचा वार्षिक अभिषेक पूजा उत्सव उत्साहात साजरा

**सावंतवाडी । वार्ताहर**

सावंतवाडी येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सावंतवाडी शहराचे जागृत देवस्थान व ३६५ खेड्यांचा अधिपती असलेल्या श्री देव उपरलकर देवस्थानचा वार्षिक अभिषेक पूजा उत्सव गुरुवारी उत्साहात साजरा झाला. यावेळी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी देखील दर्शन घेतले. दरम्यान सावंतवाडीतील राजघराण्याचे दैवत असलेल्या या देवस्थानचा वाढदिवस दरवर्षी मोठ्या उत्सव म्हणून साजरा होतो.

सावंतवाडी -आंबोली रस्त्याच्या बाजूला असलेले हे देवस्थान जागृत आहे. या रस्त्याने जाणाऱ्या प्रत्येक वाहनधारक या देवतेला नतमस्तक होऊनच पुढे रवाना होतो. महाराष्ट्र राज्यसह कर्नाटक, गोवा, राज्यातून दरवर्षी उत्सवाला भाविक



सावंतवाडी दाखल होतात. यावर्षीही उत्सवासाठी भाविकांनी सकाळपासूनच मोठी गर्दी केली होती. तर देवस्थानकडून सकाळपासूनच विविध कार्यक्रमा चे आयोजन करण्यात आले होते. सकाळी देवावर अभिषेक व पूजा उत्सवानिमित्त पूजापाठ, त्यानंतर सर्व भाविकांना दर्शन व तीर्थप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील भाविकांनी तसेच जिल्हा बाहेरील भाविकांची दर्शन घेण्यासाठी व नवस, बोलणे व फेडण्यासाठी गर्दी दिसत होती.

# पंचक्रोशी ठाकर समाज कणकवली च्या प्रयत्नाने जात प्रमाणपत्र देण्यास सुरूवात

**कणकवली । प्रतिनिधी**


पंचक्रोशी ठाकर समाज कणकवली यांच्या प्रयत्नाने जात प्रमाणपत्र देण्यास सुरुवात झाली असून ठाकर समाज बांधवांनी जात प्रमाणपत्रासाठी आपले अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह सादर करावे. तसेच काही समस्या उद्भवल्यास पंचक्रोशी ठाकर समाज च्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

मागील अनेक दिवस सिंधुदुर्गातील जिल्ह्यातील ठाकर समाज बांधवांना जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते.काही समाज बांधवांना जात पडताळणी छाननी वेळी अवैध ठरवले होते. मात्र त्याचा ठपका ठेवत प्रांताधिकारी कणकवली दि.३ जानेवारी २०२३ रोजी कणकवली तालुक्यातील ठाकर समाज बांधवांना जात प्रम ाणपत्र देणे बंद करण्याचे आदेश दिले होते, त्यानुसार तहसिलदार कार्यालय कणकवली येथील सेतू विभागात ठाकर समाज जात प्रमाणपत्र अर्ज घेणे बंद केले. त्यामुळे ठाकर समाजातील शालेय विद्यार्थी व विविध योजनांचे लाभार्थी यांचे मोठे नुकसान झाले अशी माहिती पंचक्रोशी ठाकर समाज अध्यक्ष अमित ठाकूर व सचिव समिर ठाकूर यांनी दिली. त्याचप्रमाणे सदरील गंभीर बाब लक्षात घेत पंचक्रोशी ठाकर सम ाजाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच काही प्रस्ताव जात प्रमाणपत्रासाठी



तहसिलदार कार्यालयातील सेतू विभागात देण्यात आले आहेत. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या विविध कारणांना योग्य प्रकारची कागदपत्रे अगदी पुराव्यासह दाखवून गेल्या वर्ष भरात रखडलेल्या दाखल्यांचा मार्ग मोकळा करण्यात पंचक्रोशी ठाकर समाजाला यश आले आहे. यावेळी अनुसुचित जमाती जात पडताळणी समिती ठाणे चे डायरेक्टर दिनकर पावरा यांच्या सदरील बाब निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानंतर श्री.पावरा यांनी प्रांताधिकारी जगदिश कातकर यांना दाखले देण्याबाबत सुचना केल्या. मात्र,मिळालेल्या माहिती नुसार दाखले देणे बंद करा असे आदेश देण्यात आले होते. बुधवारी प्रांताधिकारी जगदिश कातकर यांच्या शंकांचे निरसन झाल्यानंतर त्यांनी मागील अनेक दिवस प्रलंबित असलेले दाखले देण्यास सुरवात केली.त्यापैकी सुहास संतोष ठाकर याचे जात प्रमाणपत्र कणकवली सेतू विभाग व प्रांताधिकारी जगदिश कातकर यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्या मुळे सुहास संतोष ठाकर यांना प्राप्त झाले. प्रांताधिकारी जगदिश कातकर यांच्या हस्ते सुहास संतोष ठाकर यांना जात प्रमाणपत्र देण्यात आले.यावेळी पंचक्रोशी ठाकर समाजाचे अध्यक्ष अमित ठाकूर, सचिव समिर ठाकूर, कार्याध्यक्ष विठ्ठल ठाकूर, उपाध्यक्ष सच्चिदानंद ठाकूर, मदन ठाकूर, सचिन ठाकूर, रामजी ठाकूर, रामदार ठाकूर यांचे सहकार्य लाभले आहे. ठाकर समाज बांधवांनी जात प्रमाण पत्रासाठी आपले अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह सादर करावे.

# उक्षीतील कातळशिल्प राज्य संरक्षित, शासनाकडून घोषणा



**रत्नागिरी । प्रतिनिधी**

उक्षी येथील कातळ खोदचित्राला राज्य शासनाने राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे. याबाबतची अधिसूचना मंगळवार (ता. ३०) जारी झाली आहे. कोकणातील प्रागैतिहासिक विशेषत्वाने म ध्याश्मयुगीन मानवाने निर्माण केलेली कलाकृती म्हणून उक्षी येथील कातळशिल्पाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. उक्षी हे मध्याश्मयुगीन काळातील असून या कातळशिल्पावर हत्ती दाखविण्यात आला आहे. संरक्षित करण्यात आलेल्या कातळशिल्पासह सभोवताली आसलेल्या ६६०.४० चौरस मीटर जागा संरक्षित करण्यात येणार आहे.

कोकणात अश्मयुगीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण अधोरेखित करणारी कातळ खोदचित्रे आहेत. कोकणात आढळून येत व असलेली कातळशिल्प हो जांभ्या दगडांनी युक्त उघड्या कातळ सड्याच्या पृष्ठभागावर कोरलेली आहेत. ही शिल्प एका विशिष्ट जागेत न आढळता समुद्रकिनाऱ्यालगत सुमारे ३०० किलोमीटर अंतरावर विविध ठिकाणी आढळून येतात.

गेल्या १३ वर्षापासून रत्नागिरीत सुधीर तथा भाई रिसबूड, धनंजय मराठे आणि डॉ. प्रा. सुरेंद्र ठाकुरदेसाई यांच्या टीमने कातळशिल्प शोध, संशोधनाला सुरवात केली. आतापर्यंत कोकणात १७५ गावांत २ हजारांहून अधिक कातळखोद चित्रे नोंद झाली आहेत. त्यातील १७ गावांतून राज्य संरक्षित स्मारक होण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे पाठवले आहेत. हा दर्जा देण्याकरिता प्रक्रिया सुरू झाली आहे.

# दोडामार्ग तालुक्यात खुलेआम जुगार

**दोडामार्ग । वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुका देखील जुगाराच्या खेळात मागे राहिलेला नाही. गोव्याच्या सीमेला लागून असलेल्या दोडामार्ग तालुक्यात गोवा राज्यातून बडे जुगारी जुगारात नशीब आजमावयास येतात त्यामुळे जुगाराला दोडामार्ग मध्ये ग्लॅमर प्राप्त झाले म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दोडामार्ग तालुक्यातील मोठा जुगारी तालुक्यातील जत्रा ठरवतो. खाकी वर्दी सोबत जत्रेची मांडवली झाली की निर्धास्तपणे जुगाराच्या मैफीली सजविल्या जातात. गोवा बॉर्डर वरील तालुका म्हणून दोडामार्गला एक वेगळे वलय प्राप्त झाले असून गोवेकर जुगारी मोठ्या प्रमाणावर तिथे जुगार खेळण्यासाठी दाखल होतात. आज दोडामार्ग तालुक्यातील झरे फुटणारे गाव येथील जत्रा असून या गावातील जत्रेला जुगाराची मोठी बैठक बसणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



## ग्रामपंचायत कार्यालय हेत, तालुका - वैभववाडी जिल्हा - सिंधुदुर्ग

जावक क्र. ग्रा.पं.हेत/४१८/२०२३ दिनांक- ३१/१/२०२४

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत हेत येथे १५ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर योजने अंतर्गत खालील प्रमाणे जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध करणेत येत आहे, ग्रामपंचायत हेत कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील सर्व मक्तेदार यांस कळविणेत येते कि हेत ग्रा.पं. येथे खालील प्रमाणे कामासाठी सिलबंद लखोट्यात निविदा मागविणेत येत आहे. तरी खालील कामांसाठी इच्छुक मक्तेदार/ठेकेदार यांनी सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत प्रसिद्ध दिनांकापासुन सात (७) दिवसांत आणून घ्यावेत

| अ.क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | हेत प्राथमिक शाळा येथे शौचालय व मुतारी बांधणे, ता. वैभववाडी | ९५,५३८/- | १५ वा वित्त आयोग |
| २. | हेत केदारलिंग मंदिर रस्त्याला श्री हरिश्चंद्र फोंडके यांच्या घराजवळ संरक्षण भिंत बांधणे ता. वैभववाडी. | ९८,५४९/- | १५ वा वित्त आयोग |
| ३. | हेत अंगणवाडी येथे शौचालय व मुतारी बांधणे ता. वैभववाडी | ८०,८६३/- | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती**

सदर कामाबाबत अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहाणेस उपलब्ध आहेत. तसेच शासकीय नियमानुसार जी.एस.टी, ग्रा.पं. कमिशन व इतर कपात यांची रक्कम देयकातून परस्पर कपात करून घेण्यात येईल.

सही/- ग्रामसेवक
ग्रामपंचायत-हेत
ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग

सही/- सरपंच
ग्रामपंचायत-हेत
ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग

# सिंधुदुर्गनगरी येथे तत्काळ कामावर हजर करून घ्या या मागणीसाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

सेवेतून कार्यमुक्त केलेल्या सर्व अंगणवाडी मदतनीसांना तत्काळ कामावर हजर करून घ्या. या मागणीसाठी गुरुवारी अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेसमोर - ठिय्या आंदोलन छेडले.

अंगणवाडी कर्मचारी सभा जनरल सेक्रेटरी कमलताई परुळेकर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी जिल्हा परिषदेसमोर आंदोलन करत अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर झालेल्या अन्यायाकडे लक्ष वेधले. यावेळी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी महाराष्ट्रातून अंगणवाडी कर्मचारी यांचा संप झाला तो शासन आणि कृती समिती यांच्यात २५ जानेवारीला झालेल्या वाटाघाटीतून संपला. त्यातील अट अशी होती की, संपकालीन सर्व कारवाया रद्द होतील. इतर सर्व जिल्ह्यांत ही अट पाळून नव्या व जुन्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा दिलेल्या मागे घेतल्या.

तसेच, कार्यमुक्त केलेल्या अशा सर्व कर्मचाऱ्यांना काम ावर विनाअट रुजू करून घेतले गेले. मात्र, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कार्यमुक्त केलेल्या मदतनिसांना अपील केल्याशिवाय व मान्य केल्याशिवाय हजर होण्यास अन्यायकारक आहे.



या मागणीसाठी गुरुवारी जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून विनाअट सर्व कर्मचाऱ्यांना हजर करून घेण्याचे लेखी आदेश द्या. संपाच्या संबंधित सर्व नोटिसा देणे बंद करा. २६ जानेवारीपासून कार्यमुक्त मदतनीस कामावर हजर झाले असल्याने त्यांचे २६ जानेवारीपासूनचे मानधन मिळाले पाहिजे, अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ते प्रतिबंध केला जात आहे. हे त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

**प्रशासनाकडून आलेल्या नोटीसा चुकीच्या**

कार्यमुक्त करण्यात आलेल्या अंगणवाडी मदतनीस केवळ संपात सहभागी झाल्या याशिवाय कोणतेही चुकीचे कृत्य त्यांच्याकडून घडलेले नाही. त्यानंतर त्यांनी २६ जानेवारीपासून अंगणवाडीत हजर राहून आपण हजर असल्याबाबतचे फोटो सुपरवायझरना पाठवले व हजर रिपोर्ट पाठवले. तरी त्यांच्या सुपरवायझरला नोटिसा पाठवून मदतनीसांना हजर करून घेतले तर तुमच्या वर कारवाई केली जाईल, अशा नोटिसा सुपरवायझर यांना पाठविण्यात आल्या. त्या चुकीच्या आहेत. त्यामुळे अन्याय झालेल्या सर्व मदतनीसांना तत्काळ कामावर हजर करून घ्या, अशी आमची मागणी आहे.

# आचिर्णे धनगरवाडी ग्रामस्थांचे उपोषण..!



**वैभववाडी । वार्ताहर**

आचिर्णे धनगरवाडी येथे जाणारा रस्ता डांबरीकरण व्हावा या मागणीसाठी येथील ग्रामस्थ (ता.९फेब्रु) रोजी आचिर्णे काज-याचे ठिकाण येथे उपोषण करणार आहेत.याबाबबत त्यांनी आज (ता.२) तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. तालुक्यातील आचिर्णे या गावातील धनगरवाडीकडे जाण्यासाठी रस्ता नाही.मुख्य गावापासून या वाडीचे अंतर ५किमी एवढे आहे.यापैकी सुमारे ३किमी रस्त्याचे डांबरीकरण झाले आहे.उर्वरीत २किमी रस्त्याचे काम गेली ५वर्षे प्रलंबित आहे.याबाबत येथील ग्राम स्थांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला.परंतू हे काम अद्याप झाले नाही.यामुळे याभागात राहणाऱ्या ग्रामस्थांची दळणवळणाची गैरसोय होत आहे. रस्ता नसल्याने औषधोपचारासाठी वयोवृद्ध व गरोदर मातांना डोलीतून कसरत करून न्याव लागत आहे.गेल्यावर्षी या रस्त्यासाठी १०लाखांचा निधी मंजूर झाला होता.मात्र याचे काम अद्याप सुरू झाले नाही. सदर रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे, अन्यथा येथील काज-याचे ठिकाण येथे उपोषणाला बसणार असल्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# थोडक्यात



## टँकरची दुचाकीला धडक, अपघातात एक जागीच ठार

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

मुंबई - गोवा महामार्गावरील पाली येथील उभी धोंड येथे वळणावर दुचाकीला टँकरने मागून धडक दिल्याने एक जण जागीच ठार, तर दुसरा जखमी झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात बुधवारी रात्री ८:३० वाजता झाला. अमोल अशोक पवार (३५,रा .साळवी स्टॉप, रत्नागिरी) असे मृत चालकाचे नाव आहे. तर प्रेम संजय पवार (१९, रा.साळवी स्टॉप, रत्नागिरी) हा जखमी झाला. अमोल पवार व प्रेम पवार दुचाकी (एमएच ०८, वाय ४९१२) घेऊन सांगलीहून रत्नागिरीला येत होते. दुचाकी महामार्गावरील पाली येथील उभी धोंड येथे आली असता मागून येणाऱ्या टँकर (एमएच ४३, सीइ ०५०५) ने मागून ठोकर दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, दुचाकीस्वार टँकरच्या चाकाखाली आला आणि यात त्याचा जागीच मृत्यू झाला. दुचाकीवरील जखमीला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच चालकाचा मृत्यू झाला होता. रत्नागिरी ग्रामीण पोलिस स्थानकाच्या पोलिस निरीक्षक महामुने यांनी कर्मचाऱ्यांसह अपघातस्थळी भेट दिली. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

## दारुविक्री प्रकरणी गुन्हा दाखल

**राजापूर । वार्ताहर**

तालुक्यातील गोठणे - दोनीवडे येथील घराच्या शेजारी देशी दारूच्या बाटल्या विक्रीसाठी स्वतःच्या ताब्यात बाळगल्याप्रणी एकाविरोधात राजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई बुधवार, दि . ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३१ वाजता करण्यात आली. पांडुरंग केशव नाचणेकर (रा. गोठणे- दोनवडे, राजापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्या विरोधात पोलिस हेड कॉन्स्टेबल अनिल केसकर यांनी तक्रार दिली. त्यानुसार, संशयित हा आपल्याच घराशेजारील केळीच्या झाडाखाली दारुच्या बाटल्या विक्रीसाठी बाळगून असताना ही कारवाई करण्यात आली आहे. त्याच्याविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## १० फेब्रुवारीपासून कार्निव्हल परेड

**पणजी । वार्ताहर**

पर्यटन खात्याने १० ते १३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान पणजी, मडगाव, वास्को आणि म्हापसा येथे राज्य महोत्सव कार्निव्हल २०२४ या राज्य महोत्सवाचे आयोजन केले आहे. कार्निव्हल परेडम ध्ये गोव्याची समृद्ध संस्कृती आणि परंपरा प्रदर्शित करण्यात येईल.

## दिवाणसाणेवाडीत गव्यांचा मुक्तसंचार

**नांदगाव । वार्ताहर**

असलदे-दिवाणसाणेवाडी (ता.कणकवली) येथे दिवसा ढवळ्या गवारेड्यांचा मुक्तसंचार दिसून येत आहे. त्यामुले परिसरात सध्या भीतीचे वातावरण आहे. या गव्यांकडून शेती, बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात येत आहे. सध्या काजू व इतर पीके तयार होत असताना त्याचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. येथील नागरिकांची ही रहदारीची वाट असल्याने त्यांना याचा धोका संभवत असल्याने वनविभागाने याकडे लक्ष देऊन त्वरीत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# जागृती आयडॉल पुरस्कारांची घोषणा



रेश्मा पालकर | रुपाली वेंगुर्लेकर | संजीवनी परब | शेखर साळगावकर | व्हळीयप्पा तलवार | सायली कौलगेकर | शुभम परब | विवेक शिरसाट

**वेंगुर्ले । सुरेश कौलगेकर**

वेंगुर्ल्यात ३ व ४ रोजी होणा-या शाश्वत कला क्रीडा जागृतोत्सवाचे औचित्य साधून जागृती आयडॉल पुरस्कारांची घोषणा नुकत्याच झालेल्या बैठकीत जागृतीचे अध्यक्ष दिलीप मालवणकर व शाश्वत सेवा बहुउद्देशीय संस्थेचे महेंद्र मातोंडकर यांनी केली आहे. जागृती मंडळाच्या माध्यमातून नावारूपात आलेल्या व्यक्तिमत्त्वांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. त्याकाळी अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावणा-या जागृतीच्या खेळाडू व कुडाळ पोलीस दलात कार्यरत असताना गतवर्षी दिवंगत झालेल्या रेश्मा प्रभाकर पालकर (प्रशंसा प्रितम कदम), सध्या वेंगुर्ला पोलीस स्टेशनला कार्यरत असलेल्या रुपाली बाबी वेंगुर्लेकर, अनेक नवीन खेळाडू घडविण्यासाठी कार्यरत असलेल्या संजीवनी परब-चव्हाण, अनेक पारितोषकांचे मानकरी असलेले जागृतीचे यशस्वी खेळाडू शेखर उर्फ यशवंत शशिकांत साळगावकर, व्हळीयप्पा बसप्पा तलवार, झी २४ तास न्यूज चॅनेलच्या मनोरंजन विभागाची प्रमुख सायली कौलगेकर, लंडन युनिव्हसिटीमधून मर्चंट नेव्हीची थर्ड ऑफिसर परीक्षा उत्तीर्ण होऊन त्याच क्षेत्रात कार्यरत असलेले शुभम शशिकांत परब व वेंगुर्ला पंचायत समितीमध्ये सिव्हिल इंजिनियरपदी कार्यरत असलेले विवेक विनायक शिरसाट यांची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. जागृती मंडळाच्या माध्यमातून वेंगुर्ल्यातील अनेक मुलांना क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात नाव कमावण्याची संधी मिळाली होती. जागृतीचे अनेक खेळाडू आज विविध पदांवर कार्यरत आहेत. जागृतीच्या सांस्कृतिक कलाक्षेत्रातून स्वतःची ओळख निर्माण करणारे अनेक गुणी कलावंतदेखील विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. अशा गुणी व्यक्तिमत्त्वांचा शोध घेऊन त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. दरवर्षी पाच गुणी व्यक्तिमत्वांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. जागृतोत्सवात राज्याचे शालेय शिक्षण तथा मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

# बाबांच्या जयघोषाने कणकवलीनगरी झाली भालचंद्रमय..!

**कणकवली । वार्ताहर**

योगियांचे योगी व असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या परमहंस भालचंद्र महाराज यांचा १२० वा जन्मदिन संस्थानात भक्तीमय वातावरणात पार पडला. भालचंद्र महाराज यांचा जन्मदिन सोहळा पाहण्यासाठी लक्षणीय भाविकांनी उपस्थिती होती, हा सोहळा भाविकांनी याची देही याची डोळा पाहिल्याने त्यांचे डोळ्यांचे पारणे फिटले. सायंकाळी भालचंद्र महाराज यांची शहरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भाविकांनी केलेल्या भालचंद्र महाराज यांच्या जयघोषा मुळे कणकवलीनगरी दुमदुमून अन् भालचंद्रमय झाली. भालचंद्र महाराज यांच्या दर्शनासाठी भाविकांची गुरुवारी रिघ लागली होती. यासोबतच समाधीस्थळी विविध फळांची आरस करण्यात आली होती. यामुळें बाबाची मूर्ती सर्वांगसुंदर दिसत होती. महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त गेले चार दिवस विविध धार्मिक



व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. गुरुवारी पहाटे काकड आरती, समाधीपूजा, जपानुष्ठान हे धार्मिक विधी पार पडले. गुबाली थंडीत पहाटे असंख्य भाविक काकड आरती म्हणत वातावरण भक्तीमय केले. सकाळच्या सत्रात भजनी कलाकारांनी भजने सादर करून महाराज यांच्या चरणी सेवा अर्पण केली. त्यानंतर ब्रह्मवृंदांनी मंत्रोपचारात समाधीस्थानी लघुरुद्र केला, भालचंद्र महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त ह. भ. प. भाऊ नाईक यांनी कीर्तन सादर केले. दुपारी संस्थानात भालचंद्र महाराज यांचा जन्म सोहळा पार पडला. हा सोहळा भाविकांनी याची देही, याची डोळा पाहिला. तत्पूर्वी वरवडे- फणसनगर येथील ख्रिस्तीबांधवांनी वाद्य वादन करत सोहळ्यात रंगत आणली, भालचंद्र महाराज यांची महाआरती झाली. त्यानंतर असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी ६ ३० वाजता प. पू. भालचंद्र महाराज यांची शहरातून ढोल - ताशसह वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. यात वारकरी सांप्रदायाचे वारकरी, भक्तमंडळी सहभागी झाले होते. पालखीच्या दिमतीला घोडे व उंट देखील होते. तसेच या मिरवणुकीत हंसाच्या रथातून बाबांची मूर्ती मिरवणूक काढण्यात विविध प्राण्यांचे देखावे व कोंबडी हे यामध्ये खास आकर्षण होते यावेळी पायी हळूहळू चाला मुखाने भालचंद्र बोला.... घोषणामाचा माझ्या भालचंद्र बाबांचा...असा जयघोष करीत कणकवलीनगरी दुमदुमून सोडली. पालखी मार्गा वरील रस्त्यावर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या आणि भालचंद्र महाराज यांचे देखावे तयार करण्यात आले होते. पालखी मिरवणुकी असंख्य भाविक सहभागी झाले होते. त्यांना ठीक ठिकाणीं मंडळांकडून अल्पोहार देखील ठेवण्यात आला होता.ही मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी करत मोबाईलमध्ये मिरवणुकीचे क्षण टिपले. पालखी रात्री संस्थानात दाखल झाल्यानंतर नित्य आरती करण्यात आली. त्यानंतर लोकराजा सुधीर कलिंगण प्रस्तुत श्री कलेश्वर दशावतार नाट्यमंडळ, नेरूर यांचा व्यंकटेश 'पद्मावती' हा प्रयोग सादर झाल्याने उत्सवाची सांगता झाली.

# ऍसिड सदृश्य पदार्थ पत्नीच्या अंगावर फेकल्याप्रकरणी पतीवर गुन्हा

**कणकवली । वार्ताहर**

दुसऱ्या पत्नीवर संशय घेऊन मारहाण करत ऍसिड सदृश्य पदार्थ पत्नीच्या अंगावर फेकल्याप्रकरणी पती तुकाराम गंगाराम कदम (५०, रा. कासार्डे कदमवाडी) याच्यावर कणकवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद पत्नीने कणकवली पोलीस ठाण्यात दिली आहे. ही घटना २७ जानेवारी रोजी पुणे- पिंपरी येथे घडली.

तुकाराम कदम यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी व तुकाराम कदम यांचे लग्न २६ नोव्हेंबर २०१५ रोजी झाले होते या अगोदर तुकाराम कदम व फिर्यादी ला दोन मुले होती. तुकाराम हा पत्नीवर संशय घेऊन नेहमी पत्नीला दारू पिऊन शिवीगाळ करून मारहाण करायचा. फिर्यादी यांचा तीस वर्षाचा मुलगा २५ डिसेंबर २०२३ रोजी मयत झाला त्यामुळे फिर्यादी व तुकाराम कदम हे दोघेही पुणे येथे गेले होते. त्यादरम्यान २७ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी व पती तुकाराम कदम यांच्यात वाद झाला या वादातून तुकाराम याने पत्नीला कमरेवर लाथ मारून खाली पडले. ती उठत असताना पती तुकाराम याने काचेच्या बॉटल मधील ऍसिड सदृश्यपदार्थ पत्नीच्या तोंडावर मारले त्यामुळे तिच्या गळ्याखाली व छातीवर जळजळल्यासारखे होत होते. तुकाराम याची पत्नी त्यादिवशी संध्याकाळी ८ वाजण्याच्या सुमारास पुणे येथून बस पकडून कासार्डे येथे आली व घडलेली हकीकत आपल्या बहिणीला सांगितली.

त्यानंतर तिच्या बहिणीने तिला भुईबावडा इथे बोलून घेतले. वैभववाडीतील सरकारी रुग्णालयात तिच्यावर प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी आधी कणकवली उपजिल्हा रुग्णालय त्यानंतर जिल्हा रुग्णालयात येथे उपचार सुरु आहेत.अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल हाडळ करत आहेत.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळाचा १२ रोजी राज्यस्तरीय मोर्चा

**वेंगुर्ले । प्रतिनिधी**

माध्यमिक, उच्च माध्यमिक, अध्यापक विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचायांच्या मागण्या गेल्या कित्येक वर्षापासून मान्य होत नसल्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांच्या महामंडळाच्या वतीने १२ फेब्रुवारी रोजी पुणे येथे राज्यस्तरीय महामोर्चाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटना अध्यक्ष अनिल राणे, सचिव गजानन नानचे व कार्याध्यक्ष प्रदीप सावंत यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे. महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा- यांचे प्रलंबित प्रश्न गेल्या कित्येक वर्षापासून प्रलंबित आहेत. सदर प्रश्न तातडीने निकाली काढले जातील असे आश्वासन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी देऊनही त्याची पूर्तता न झाल्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळाचे राज्य अध्यक्ष अनिल माने, राज्य सरकार्यवाह शिवाजी खांडेकर, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर यांच्या नेतृत्वाखाली १२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी भव्य मोर्चाचे आयोजन पुणे येथील शनिवार वाडा ते शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त कार्यालय सेंट्रल बिल्डिंग पुणे येथे करण्यात आले असून राज्यातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने महामोर्चा काढण्यात येणार आहे तसेच दिनांक २० फेब्रुवारी २०२४ पासून राज्यातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी काम बंद आंदोलन करतील असा इशारा राज्य महामंडळाच्या वतीने देण्यात आला आहे. ७ जानेवारी रोजी सावंतवाडी येथे शिक्षकेतर कर्मचा- यांचे राज्य अधिवेशन संपन्न झाले. त्यावेळी सदर अधिवेशनात मंत्र्यांनी प्रलंबित प्रश्न सोडविण्याचा दिलेला शब्द पाळला नाही. त्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मोर्चा काढणार असल्याचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्री या संबंधित विभागांना राज्य महामंडळाच्या वतीने देण्यात आले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या १०/२०/३० च्या लाभाची योजना त्वरित मंजूर करावी, आकृतीबंध संदर्भात नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेला अहवाल मंजूर करून शिक्षकेतरांच्या भरतीस त्वरित परवानगी मिळावी, शिक्षकेतर कर्मचा- यांना २४ वर्षांचा दुसरा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा, पदवीधारक ग्रंथपालांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी, विद्यार्थी संख्या कमी झाल्यास शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व वेतन श्रेणी संरक्षण मिळावे, विनाअनुदानित तुकडी वरील विद्यार्थी संख्या शिक्षकेतर पदे मंजूर करताना ग्राह्य धरावी आदी प्रलंबित प्रश्न त्वरित निकाली काढण्यात येतील असे आश्वासन शिक्षण मंत्री यांनी दिले होते परंतु याबाबत शासनाकडून कोणतीही सकारात्मक हालचाल होताना दिसून येत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# बांदा पोलीस निरीक्षकांचे सामाजिक कार्यकर्त्यांकडून स्वागत



**बांदा । वार्ताहर**

येथील बांदा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शामराव काळे यांची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभारी अधिकारी सागरी सुरक्षा सिधुदुर्ग या पदी बदली झाल्याने त्यांच्या जागी अप्पर पोलीस अधिक्षक यांचे वाचक म्हणून काम पहाणाऱ्या विकास बडवे यांची बांदा पोलिस ठाण्याचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. दरम्यान आज बांदा येथील सामाजिक कार्यकर्ते गुरु कल्याणकर,बांदा ग्रा. पं. सदस्य प्रशांत बांदेकर, कास सरपंच प्रविण पंडित, निगुडे माजी सरपंच समीर गावडे, डिंगणे सरपंच संजय डिंगणेकर, निगुडे माजी उपसरपंच गुरुदास गवंडे, रोणापाल ग्रा. पं सदस्य योगेश केणी यांनी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी बांदा पंचक्रोशीतील समस्यां व सलोखा राखण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी श्री बडवे यांनी ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींच्या अडचणी,समस्या व प्रश्न जाणुन घेतले. तसेच याबाबत आपले नेहमीच सर्वतोपरी सहकार्य लाभेल असे सांगितले. आम्ही आपल्या सेवेसाठीच असुन, सर्वाच्या सहकार्याने पंचक्रोशीत कायदा व सुव्यवस्था राखण्यात येईल व सर्व प्रकारच्या गैरकृत्यांना आळा घातला जाईल असे आश्वासन दिले.

# वेंगसरकर सरांचे क्रिकेटमधील योगदान अतुलनीय - संजय पाटील

**मुंबई । विजय बने**

दिलीप वेंगसरकर सरांचे क्रिकेटमधील योगदान अतुलनीय आहे असे मुंबईचे माजी फिरकी गोलंदाज आणि मुंबईच्या निवडसमितीचे सदस्य असणाऱ्या संजय पाटील यांनी म्हटले आहे. माहुल, चेंबूर येथील एजिस फेडरल वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या मैदानात एजिस फेडरल इन्शुरन्स कप या १२ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. वेंगसरकर यांचे क्रिकेट वरील प्रेम आणि निष्ठा याची कुणाशीही तुलना होऊ शकत नाही आणि अशा महान व्यक्तीचा सहवास आणि मार्गदर्शन तुम्हा युवा खेळाडूंना लाभणे हे खरोखर भाग्याचे आहे असे देखील ते पुढे म्हणाले. दरम्यान वेंगसरकर यांनी यावेळी बोलताना सध्या परीक्षांचा मोसम तोंडावर असताना आता मोबाईल किंवा अन्य गोष्टींमध्ये वेळ वाया न घालवता क्रिकेट आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करा, तुम्ही नक्कीच चांगले मार्क्स मिळवाल असा विश्वास व्यक्त केला. गणेश पालकर क्रिकेट क्लब या संघाने अंतिम फेरीत ड्रीम ११ वेंगसरकर क्रिकेट अकादमीवर पाच विकेट्सनी मात करून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. गणेश पालकर क्रिकेट क्लब संघाने प्रथम फलंदाजी करणाऱ्या ड्रीम ११ वेंगसरकर क्रिकेट अकादमी संघाला निर्धारित ३५ षटकांत ८ बाद १४२ धावांत रोखले. अथर्व कालेल (३३) आणि आरुष कोल्हे (६४) यांचा अपवाद वगळता त्यांच्या अन्य फलंदाजांना फारशी चमक दाखविता आली नाही. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ५७ धावांची भागी रचली होती. कर्णधार वेदांग मिश्रा याने २८ धावांत ३ तर सुरज केवत याने १४ धावांत २ बळी मिळवत प्रतिस्पर्धी संघाला रोखले. या आव्हानाचा पाठलाग करताना गणेश पालकर क्रिकेट क्लबने ५१ धावांत ३ बळी गमावले होते; पण अर्णव शेलार (नाबाद २७) आणि



एजिस फेडरल इन्शुरन्स कप या १२ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धत अजिंक्य ठरलेल्या गणेश पालकर क्रिकेट क्लब संघाचे छायाचित्र. सोबत (डावीकडून) अकादमीचे प्रशिक्षक अमित जाधव, एजिस फेडरलचे मुख्य व्यवस्थापक आनंद सिंग, दिलीप वेंगसरकर, खार जिमखानाचे अध्यक्ष विवेक देवनानी आणि मुंबईच्या क्रिकेट निवड समितीचे सदस्य रणजीपटू संजय पाटील.

सन्मित कोथमिरे (१४) यांनी चौथ्या विकेटसाठी ४६ धावांची भागी रचून संघाचा विजय निश्चित केला. शिवम सम्राट (३७) आणि सिद्धांत सिंग (२०) यांनी देखील संघाच्या यशात खारीचा वाटा उचलला. ड्रीम ११ वेंगसरकर क्रिकेट अकादमीचा डावखुरा फिरकी गोलंदाज हमझा खत्री याने अप्रतिम गोलंदाजी करताना १९ धावांत ३ बळी मिळविले. मात्र त्याच्या गोलंदाजीचा कोटा संपला आणि प्रतिस्पर्धी संघाने नंतर आरामात धावा घेत संघाला विजयी केले. अंतिम सामन्यातील आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गणेश पालकर सी.सी. संघाच्या कर्णधार वेदांग मिश्रा याची निवड करण्यात आली तसेच सर्वोत्तम फलंदाज आणि क्षेत्ररक्षक ( १४६ धावा आणि ६ झेल )ही दोन्ही पारितोषिके देखील त्यानेच पटकावली. सर्वोत्तम गोलंदाज म्हणून आयन गर्ग (७ बळी) याला गौरविण्यात आले. दिलीप वेंगसरकर, मुंबई क्रिकेट निवड समितीचे सदस्य संजय पाटील, खार जिमखानाचे अध्यक्ष विवेक देवनानी आणि एजिस फेडरलचे मुख्य व्यवस्थापक आनंद सिंग यांच्या हस्ते विजेत्यांना गौरविण्यात आले. संक्षिप्त धावफलक - ड्रीम ११ वेंगसरकर क्रिकेट अकादमी - ३५ षटकांत ८ बाद १४२ (अथर्व कालेल ३३, आरुष कोल्हे ६४; सुरज केवत १४ धावांत २ बळी, वेदांग मिश्रा २८ धावांत ३ बळी) पराभूत वि. गणेश पालकर क्रिकेट क्लब - २९.५ षटकांत ५ बाद १४३ (सिद्धांत सिंग २०, शिवम सम्राट ३७, अर्णव शेलार नाबाद २७; हमझा खत्री ३ बळी). सामनावीर - वेदांग मिश्रा.